मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वती जन्मभू:

जुलै १९५४
किंमत आठ आणे

संपादक
पु. य. देशपांडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष ९ वें] जुलै १९५४ [अंक ४ था

काटोल दप्तरी स्मृति
ग्रंथ संग्रहालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

संपादक–मंडळ

ग. त्र्यं. माडखोलकर
के. ज. पुरोहित
पां. ब. गाडगीळ
सौ. कुसुमावती देशपांडे
गो. रा. दोडके
ना. रा. शेंडे

या अंकांत

निर्मिति व दिग्दर्शक — वा. बा. भोळे
विदर्भांतील कांही लोकगीतें — ना. रा. शेंडे
माणूस आणि कला — पु. य. देशपांडे
नागपूर प्रांतांतील एक अज्ञात कवि — सदाशिवराव काकडे
कै. भा. रा. लोवलेकर (संस्मरण) — प्रभाकर माचवे
कविता—प्रा. मा. ल. व्यवहारे, गुणाकर देशपांडे, बाबा मोहोड;
परीक्षणें—अ. ना. देशपांडे, कुसुमावती देशपांडे, केशव केळकर.
याशिवाय, पत्रव्यवहार, संघवार्ता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्यसंघ, परीक्षा समिति, नागपूर.

आवेदनपत्र व माहितीपत्रक :– आवेदनपत्रक आणि प्रश्नपत्र कार्यवाह – परीक्षा – समितीकडे मागविल्यास केवळ डाकव्ययाचीं तिकिटें (२ आणे) घेऊन निर्मूल्य पाठविण्यांत येतील. परीक्षार्थीनी याकरितां आपली योग्यता व अपेक्षित परीक्षा स्पष्ट सूचित केली पाहिजे. परीक्षा विषयक सर्व पत्रव्यवहार श्री. कार्यवाह–परीक्षासमिति वि. सा. संघ आणि मनीऑर्डर, चेक इ. प्रकारचा सर्व आर्थिक व्यवहार श्री. सरचिटणीस –वि. सा. संघ नागपूर या पत्यावर करावा. पुस्तकांसंबंधी कोणत्याहि प्रकारचा पत्रव्यवहार परीक्षा – समितीकडे करूं नये. परीक्षार्थीच्या माहितीकरितां केवळ नागपुरांतील पुढील तीन प्रकाशकांची नांवें सूचित करण्यांत येत आहेत. (१) वीणा प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, (२) ठाकूर आणि कंपनी महाल नागपूर (३) कर्मवीर बुक डेपो, महाल, नागपूर. गरजूनी प्रस्तुतपैकीं कुणाकडेहि पुस्तकें पाठविण्यासंबंधी पत्रव्यवहार करावा.

परीक्षा समिति सात्रिक कार्यक्रम १९५४

कार्यक्रम	सत्र १: ऑगस्ट ५४
(१) परीक्षा आरंभ तारीख	२१ ऑगस्ट ५४
(२) नव्या केंद्रांकरितां आवेदन पाठविण्याची ता.	५ जुलै
(३) आवेदनपत्रें केंद्राधिकाऱ्याकडे पाठविण्याची अंतिम ता.	१० जुलै
(४) परीक्षा समितीकडे प. आवेदनपत्रें पाठविण्याची ता.	१५ जुलै
(५) परीक्षाफल घोषित होण्याची अंतिम तारीख	१५ ऑक्टोबर
(६) प्रमाणपत्रें प्राप्त होण्याची अंतिम तारीख	१ नोव्हेंबर

अभ्यासक्रम विषयक प्रस्ताव–नवा अभ्यासक्रम ऑगस्ट १९५४ ते ऑगस्ट १९५६ पर्यंत चालूं राहील. केवळ ऑगस्ट १९५४ करितां मागील वर्षीचा अभ्यासक्रम विकल्प रूपाने राहील. तसेंच ऑगस्ट १९५६ पर्यंत अभ्यास क्रमांत कोणतेंहि परिवर्तन होणार नाही. झाल्यास तें केवळ वैकल्पिकच राहील.

साहित्याचार्य (प्रबंध परीक्षा)

पात्रता:– वि. सा. संघाची पारंगत परीक्षा, सरकारमान्य विद्यापीठाची एम्. ए. (मराठी), महाराष्ट्र साहित्य परिषदेची 'आचार्य' व तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्यांनाच या सर्वोच्च प्रबंध परीक्षेला बसता येईल.

प्रस्तुत परीक्षेसंबंधीची सविस्तर नियमावलि, ८ आण्यांची तिकिटे पाठवून मागवावी.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यु ग वा णी

वर्ष ९ वें जुलै १९५४ अंक ४ था

संपादकीय

'साहित्य अकादेमी'ची स्थापना

गेल्या अंकांत 'मध्यप्रदेश – शासन साहित्य परिषदे'वरील आमचे विचार आम्हीं प्रगट केले आहेत. या खेपेस मध्यवर्ति सरकारनें स्थापन केलेल्या 'साहित्य–अकादेमी' संबंधी विचार करावयाचा आहे. मध्यप्रदेश साहित्य परिषदेचे व अकादेमीचे उद्देश बरहुकूम एक सारखेच आहेत. शासनाच्या हस्तक्षेपाबद्दल आम्ही जें लिहिलें होते तेंच 'अकादेमी'ला लागू पडेल. कोणच्याही लोकसत्ताक देशांत कलाविषयक आणि वाङ्मयीन चळवळींमध्यें सरकारचा हस्तक्षेप कधींच होत नसतो, तसेंच सांस्कृतिक चळवळींचें नेतृत्व त्या देशांतील सरकार कधींच करीत नाहीत. परंतु पंतप्रधान पं. जवाहरलालजींचें मत असें दिसते कीं, भारतवर्ष फार मागासलेलें आहे आणि येथील जनतेला प्रत्येक गोष्ट शिकवावी लागेल. सरकारला प्रत्येक विषयांत कांही कालपर्यंत मार्गदर्शन करणें इष्ट आहे. लोकांमध्यें वाङ्मयाभिरुचि निर्माण करणें, वाङ्मयाचें संवर्धन करणें, देशांतील प्रमुख भाषांमध्यें सलोखा वाढविणें, सांस्कृतिक देवाण घेवाण करणें इत्यादि प्रश्न सरकारनेंच हाताळले पाहिजेत, कारण लोक आपणहून कांहीही करणार नाहीत. या विचारामुळेंच भारत सरकारनें ही अकादेमी स्थापन केली आहे. उद्देश स्तुत्य आहे आणि या संस्थेचा फार मोठा उपयोग होण्यासारखा आहे. मात्र यांत खरी अडचण एकच आहे, ती म्हणजे सरकारी नियंत्रणाची. सरकारनें ही सभा (अकादेमी या धेडगुजरी व हास्यास्पद शब्दापेक्षां 'सभा' हा शब्द युक्त आहे) स्थापन केली हें ठीकच झालें, तिच्या कामाची नऊ कलमें तयार केली, कार्य विस्तृत प्रमाणावर होईल व सर्व भाषांना न्याय देण्यांत येईल अशी व्यवस्था केली हेंही ठीक झाले. परंतु सरकारी नियंत्रण निमित्तमात्र राहील याची खात्री वाटत नाही. तसेंच सभेवर जे सभासद नियुक्त केले आहेत त्यांतील साहित्यकार कोणच्या प्रतीचे आहेत, विद्यापीठांचे व प्रांताचे प्रतिनिधी वाङ्मयकार आहेत कां, याची चौकशी केलेली दिसत नाही. सरकारनें नेमलेले चिटणीस व सहचिटणीस सोडून इतर सन्मान्य सभासद त्या त्या प्रांतांतील मान्यवर साहित्यकार असावयास पाहिजेत. उदाहरणार्थ मध्यप्रदेशाचा, बडा सरकारी अधिकारी असलेला सभासद हा साहित्यकार असल्याचें आम्हांस माहीत नाही. तसेंच कांही विद्यापीठांनी निवडलेले सभासद साहित्यकार्यांत कोठेंही चमकलेले दिसत नाहीत. मुंबई विद्यापीठाचा जो प्रतिनिधी अकादेमीवर घेतलेला आहे त्याचें साहित्यकर्तृत्व काय आहे याचा अदमास आम्हांस लागलेला नाही. कांही विद्यापीठांना प्रतिनिधित्व मिळालेलें नाही. नागपूर, सागर व पुणें या विद्यापीठांचे प्रतिनिधी सभेच्या साधारण कार्यकारिणीवर घेतलेले दिसत नाहीत. या उणीवा व सरकारी हस्तक्षेपासंबंधीची शंका आमच्या मनांत उत्पन्न झालेली आहे. तिचें निरसन सभेकडून होईल अशी आशा आहे.

साहित्य संस्थांचें कार्य

सभेचें कार्य सुरू व्हावयाचें आहे आणि म्हणूनच तिच्या कार्यासंबंधी शंका घेणें आज इष्ट होणार नाही. सभेचे उद्दिष्ट स्तुत्य आहे, साहित्यविषयक कार्याची आवश्यकता उत्पन्न झालेली आहे आणि सरकार उदार

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अंतःकरणानें वाङ्मयसंवर्धनास मदत करण्यास तयार आहे. याचा फायदा भारतीय भाषांतील वाङ्मय-कारांनी अवश्य घेतला पाहिजे, तसेंच भारतीय भाषांच्या साहित्यिक संस्थांनीं सभेला सर्व तऱ्हेचें सहाय्य करणें योग्य होईल. विविध भारतीय भाषांतील वाङ्मयाची सूचि करणें, निवडक लेखनाचे संग्रह प्रसिद्ध करणें, विविध भारतीय भाषांतील वाङ्मयाचे इतिहास, इंग्रजी व हिंदी भाषांत प्रसिद्ध करणें, उत्कृष्ट पुस्तकांचीं इतर भाषांत भाषांतरें करणें, इत्यादि कार्यास वाङ्मय-संस्थांनी सहाय्य करणें इष्ट आहे. सभेला सर्व भाषांतील उत्कृष्ट ग्रंथांची माहिती होणें एकदम शक्य होणार नाही. अशा वेळेस महाराष्ट्र साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघासारख्या मराठी वाङ्मय संस्थांनी मराठीपुरतें, तरी सहाय्य देणें इष्ट होईल. मराठी ग्रंथांची निवड करून ती सभेला कळविणें, तसेंच अद्यावत् प्रकाशनांची माहिती सादर करणें, ग्रंथप्रकाशनाच्या बाबतींत मदत करणें, मराठींतील अभिजात साहित्याची, संपूर्ण सूचि बनविणें इत्यादि कार्यांत विदर्भ साहित्य संघासारख्या संस्थांना विधायक भाग घेतां येण्यासारखा आहे. सभेच्या इतर संकल्पित कार्यातही मदत करतां येण्यासारखी आहे. पारितोषिकास योग्य असलेल्या साहित्यकृतींची माहिती सभेस देणें, अनुवाद अगर रूपांतर करण्याच्या कार्यांत सहाय्य करणें इष्ट आहे.

साहित्याचें संवर्धन व गौरव

फ्रेंच ॲकॅडेमीचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून या सभेची स्थापना करण्यांत आलेली आहे. सर्व भारतीय भाषांना प्रतिनिधित्व मिळालें आहे पण सदस्यांची संख्या वाढविण्यास कांहीं हरकत नसावी. कारण जितके सभासद (अर्थात् नामवंत साहित्यकार) जास्त तितकी सभा जास्त लोकाभिमुख होईल असें वाटतें. सभेचें कार्य व्यापक आहे आणि म्हणूनच वाङ्मयांतील निरनिराळ्या शाखांत कामगिरी बजावणाऱ्या साहित्यकारांचें सहाय्य घेणें इष्ट होईल. या दृष्टीनें सभेची कार्यकारिणी जास्त प्रातिनिधिक व लोकमान्य झाली पाहिजे. या सभेकडून साहित्यसंवर्धनाचें कार्य निश्चितच होणार आहे. निरनिराळ्या भारतीय भाषांची संघटना व उन्नति होण्याचा सुयोग आलेला आहे. लोकाश्रया-बरोबरच शासनाश्रयाचा आधार साहित्याला मिळणार आहे. साहित्यकारांना कर्तबगारी दाखविण्याचा सुयोग आलेला आहे. तेव्हां मध्यवर्ति सरकारनें स्थापन केलेल्या या सभेची साहित्यसंवर्धनासाठीं मोठीच मदत होणार आहे. तसेंच भारतीय भाषांतील अभिजात सारस्वताचा गौरव होण्याचा काळ आलेला आहे. अशा समयीं स्वभाषेला अन्याय होणार नाही याचा मराठी साहित्यकारांनी विचार केला पाहिजे, व सभेला सहाय्य करण्यास पुढें सरसावलें पाहिजे. सभेला सहाय्य करण्यांत आपण आपल्या भाषेंतील साहित्याचा गौरव करणार आहोत व इतर भाषांतील अभिजात साहित्य-कृतींचा सत्कार करणार आहोत हें विसरतां कामा नये. साहित्य सभेची स्थापना हें प्रसादचिन्ह समजून आपल्या वाङ्मयाचें संगोपन, संवर्धन व सौष्ठव साधण्यासाठीं कार्यतत्पर झालें पाहिजे.

आज मराठी वाङ्मयाच्या स्फूर्तीला विशेष जोर आलेला आहे. परंतु याचा अर्थ असा नाही कीं, आपल्या वाङ्मयांत सर्व कांहीं चांगलें आहे. बंगाली, हिंदी, गुजराती, मल्याळम्, तमिळ, तेलुगु इत्यादि भाषांतील ओजस्वी व अभिजात वाङ्मयाची आपणांस ओळख असणें इष्ट आहे. ती ओळख करून देणें, वाङ्मयवृद्धीचें उपाय योजणें, साहित्याभिरुचि वाढविणें इत्यादि कार्यें साहित्य – सभेपुढें आहेत, 'साहित्य सोनियाचिया खाणी । उघडवी देशियेचिया क्षोणी' अशी आमची या साहित्यसभेला विनवणी आहे.

याच साहित्यसभेचे सहचिटणीस म्हणून आमचे मित्र प्रभाकर माचवे यांची नियुक्ति झाली आहे. त्यांचें आम्हीं हार्दिक अभिनंदन करतो व त्यांच्या कार्यांत यश प्राप्त व्हावें अशी आशा करतो.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निर्माते आणि दिग्दर्शक

★ ★ ★ ★ लेखक वा. वा. भोळे ★ ★ ★ ★

नट, नाटककार, निर्माता आणि दिग्दर्शक यांच्या परस्पर सहकार्यानें नाटचकृति आविष्कृत होते, ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहे. नाटककार आणि नट या दोन घटकांविषयीं मी आतांपर्यंत माझे अनुभव सांगितले. निर्माता आणि दिग्दर्शक यांच्याविषयीं आज थोडें विवेचन करणार आहे. चित्रपटसृष्टीकडे नजर टाकतां कथा, भांडवल, नटसंच, सीनसीनरी वगैरे गोष्टींचा जो पुरवठा करतो त्याला साधारणत: निर्माता म्हणतात. रंगभूमीच्या बाबतींत नाटकाची निवड होऊन ज्या कंपनीमार्फत तें रंगभूमीवर येतें त्या कंपनीला निर्माता म्हणण्यास हरकत नाही. नटांना तालीम देऊन हें नाटक जो बसवितो त्याला दिग्दर्शक किंवा तालीम मास्तर म्हणतात. कांहींवेळीं खाडीलकर, देवल, वरेरकर इत्यादि नाटककारांनी स्वत:च दिग्दर्शकाचें काम केलें आहे. तर इतरत्र जनूभाऊ निमकरांसारखे कंपनीचे मालकच, निर्माता आणि दिग्दर्शक, या दोन्ही भूमिका वठवतांना दिसतात. अशी निरनिराळी व्यवस्था दिसत असली तरी, मराठी नाटचाच्या विकासाच्या दृष्टीनें निर्माते आणि दिग्दर्शक म्हणून ज्यांनी भरीव कामगिरी केली, अशांची माहिती, जितकी मनोरंजक तितकीच उद्बोधकही आहे.

या दृष्टीनं पहातां पहिल्यांदा आठवण होते ती अण्णा किर्लोस्करांची. त्यांच्यापूर्वी अंदाजे ४० वर्षे मराठी रंगभूमि अस्तित्वांत होती; जोरांतही होती, पण सुसंघटित नव्हती. तिला सर्व दृष्टींनी सुसंघटित केली ती अण्णांनीच. कथा, व्यक्तिदर्शन आणि संवाद हीं नाटचाचीं प्रमुख अंगें अण्णांनीच प्रथम रंगभूमीवर आणलीं. त्यावेळच्या समाजाच्या आवडीप्रमाणें, नाटकें संगीतप्रधान करणें आवश्यक होतें. म्हणून त्यांनी संगीत घेतलें. घेतांना मात्र त्याला उच्च दर्जा दिला आणि आपल्या कंपनींतील पात्रांच्या कुवतीप्रमाणं प्रत्येकाच्या तोंडी तें घातलें. कथा आणि संगीत, हे अर्थात एकजीव झालें. त्यामुळें पात्रांचें गायन मर्यादेबाहेर न जाऊं देतां तें रसानुकूल आणि अभिनययुक्त करण्याची खबरदारी त्यांनी घेतली. इथेंच दिग्दर्शक आणि संघटक या दोन्ही नात्यांनी अण्णा चांगलेच चमकले. त्यांच्या शिक्षणानें लोकांची संगीताची आवड पूर्ण झालीच.पण त्याच बरोबर संगीत, हें नाटचाला बाधक न होतां त्याला उठाव देण्याचें साधन ठरलें. हीच प्रथा त्यांचे शिष्य देवल मास्तर यांनी पुढे चालविली. त्यांच्या शारदा नाटका-मुळे परिणामकारक रीतीनें ध्येयाविष्कार करणारा पहिला नाटककार म्हणून देवलांना मान मिळाला. पण ह्याचबरोबर एक चांगला नाटयशिक्षक म्हणूनही त्यांनी कीर्ति मिळविली. मात्र दिग्दर्शक या नात्यानें देवलांच्या सामर्थ्याला मर्यादा होत्या. प्रत्येक नाटचकृतीमागे कांहीतरी उद्दिष्ट किंवा मध्यवर्ती अशी कल्पना असते. यालाच त्या नाटचाचा आत्मा म्हणायला हरकत नाही. नाटकांत काम करणाऱ्या नटामध्यें Team Spirit निर्माण करून, ज्या योगानं या आत्म्याचा ठसा प्रेक्ष-कांच्या मनावर उमटेल, अशाप्रकारचें अभिनय शिक्षण जो देऊं शकतो, तोच खरा दिग्दर्शक. यादृष्टीनें पहातां पात्रांचे स्वभाव नटांना काटेकोर स्वच्छतेनें समजावून देऊन त्यांना या पात्राशी समरस करणें आणि नटांच्या नैसर्गिक गुणांना वाव देऊन, त्यांतूनच, हातीं घेतलेल्या नाटचाच्या आत्माविष्काराचें उद्दिष्ट साध्य करून घेण्याचें कौशल्य, दिग्दर्शकांजवळ मुख्यत: असायला पाहिजे. या गोष्टी देवलांच्याजवळ कितपत होत्या याबद्दल शंका आहे. ज्या बालगंधर्वाला शिक्षण देण्याचा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

योग देवलांना आला तेच गंधर्व देवलांच्या विषयीं एकेठिकाणीं म्हणतात कीं, " देवल उत्तम अभिनय शिक्षक होते. पण विवेचनाचा, म्हणजे भूमिका समजावून देण्याचा भाग त्यांच्या शिक्षणांत नसे. त्याचप्रमाणें त्यांच्या सांगण्याप्रमाणें अभिनय व टोनिंग नटाला जमलें नाही तर त्या नटाचे बाबतींत ते उदासीन होत, आणि नटाचा, प्रोत्साहनाचे अभावीं, हिरमोड होई. बोडस हे देवलांचे शिष्य आणि अभिनय शिक्षक आहेत; पण नटाला एखादी गोष्ट समजली नाही, तर तशा नटाच्या अभिनयाची ते चेष्टा उडवतात व ह्यामुळें नटांच्या गुणांचा विकास होत नाही. बोडसांना एकही नट निर्माण करतां आला नाही याचें कारण हें आहे." बालगंधर्वांचें, देवल आणि बोडस यांच्या विषयींचें हे मत कितपत बरोबर आहे हें पहाण्याकरतां 'शारदा' नाटकाचा प्रयोग हें एक चांगलें उदाहरण आहे. किर्लोस्कर कंपनीच्या शारदेच्या प्रयोगापेक्षां, स्वदेश हि. चिंतक मंडळीचा प्रयोग जास्त उठावदार होत असे आणि केशवराव भोंसल्यांच्या शारदेच्या कामानें या नाटकाला अमर कीर्ति मिळवून दिली, या गोष्टी प्रसिद्ध आहेत. 'माझा नाटकी संसार' या आपल्या पुस्तकांत 'पूर्वी पाहिलेल्या किर्लोस्कर नाटकमंडळीच्या नाटकाचें साम्य–एक भाऊराव खेरीज करून–मला स्वदेश हित चिंतक मंडळींच्या नाटकांत प्रतीत होऊं लागलें; इतकेंच नव्हे तर अभिनयाच्या दृष्टीनें ही मंडळी, किर्लोस्कर मंडळीपेक्षांही जास्त वरच्या दर्जाची आहे, असें त्यावेळच्या माझ्या बालबुद्धीलाहि वाटलें ..एक कृष्णराव गोऱ्यांचें इंदिरा काकूंचें काम सोडल्यास, स्व. हि. चिंतक मंडळीचा शारदा नाटकाचा प्रयोग, किर्लोस्कर मंडळीच्या प्रयोगापेक्षां, किती तरी पटीनें चांगला होत होता, असें मला त्यावेळीं वाटलें.' 'असें जें मामा वरेरकरांनी म्हटलें आहे तें विचार करण्यासारखें आहे, असें मला वाटतें. स्वतः करीत असलेल्या भूमिकांची समज, बोडस हे चिंतनानें आणि परीश्रमानें, स्वतःच करून घेत असावेत. म्हणून त्यांनाच काय तो देवलांच्या तालमीचा फायदा झाला असावा.

कोल्हटकरांच्या प्रेमशोधन नाटकांच्या तालमी, खाडीलकरांनी घेतल्या; तेव्हांपासून तेच किर्लोस्कर आणि गंधर्वमंडळीचे मुख्यतः दिग्दर्शक झाले. त्यांच्या तालमीमुळें जोगळेकर आणि बालगंधर्व, हे दोघे, नट म्हणून पुढे आले. १९०८ चे सुमारास अभिनयाचा अभाव आणि इतर कारणामुळे उमरावतीस कांही प्रेक्षकांकडून जोगळेकरांची वरीच टिंगल झाली होती. पुढें खाडीलकरांमुळे मानापमानांतील धैर्यधराची भूमिका, अभिनयदृष्टचाहि, जोगळेकर इतकी उत्कृष्ट करीत कीं, 'आतां उमरावतीला गेलो कीं प्रेक्षकांवर छाप पाडतो कीं नाही तें पहा.' असें अगदीं योग्य अभिमानानें ते म्हणत असत, म्हणून माझ्या कानीं आलें होतें. खाडीलकरांच्या शिक्षणपद्धतीमुळं, नट आणि नाट्य, यांच्या उत्कर्षाला किती भरीव मदत झाली, याबद्दल बालगंधर्वांनी केलेलें वर्णन जसेंच्या तसें सांगण्याचा मोह मला आवरत नाही. ते म्हणतात 'भूमिका समजल्याशिवाय आणि नट त्यांत एकरूप झाल्याशिवाय त्याचें काम कधीही वढायचें नाही असा खाडीलकरांचा रोख असे. ह्यामुळें नाटकांतील भूमिकांची, प्रसंगाची, त्याचप्रमाणे महत्वाच्या वाक्यांची ते फोड करून सांगत; आणि ह्यावेळचें त्यांचें विवेचन इतकें मार्मिक आणि रसाळ असे कीं त्यांत नटमंडळी तल्लीन होई. ते नटाच्या दृष्टीनें भूमिकेकडे पहात आणि त्याच दृष्टीनें त्याला ती समजून देतांना, ते त्याचा हिरमोड करीत नसत. तालमीचे वेळीं एखादा अभिनय, एखाद्या नटाला जमत नाहींसें वाटलें, तर इतरांचा वेळ फुकट जाऊं नये म्हणून, ते तितकेच ठेवीत, आणि तालीम संपल्यावर त्या नटाला सर्व वाक्य व अभिनय समजावून देऊन, त्याच्याकडून तो अभिनय वठवून घेत. विद्याहरण नाटकानें गोविंदराव टेंबे यांना आणि स्वयंवरानें पंढरपूरकरबुवा आणि पेटकर, यांना पुढें आणलें. संगीत कंपन्यांच्या रंगभूमीवर, नाट्य व अभिनय, संगीताच्या बरोबरीनें दिसायला लागला, याचं श्रेय खाडीलकरांच्या नाटकांना व त्यांच्या तालमींना आहे.'

बालगंधर्व यांचा हा अभिप्राय, कांहीजणांना कदाचित् अतिशयोक्तीचा वाटेल. म्हणून नटवर्य दाते यांनी खाडीलकराविषयीं एकेठिकाणीं जें म्हटलें आहे तें त्यांच्याच शद्बांत सांगतो. 'मला खाडीलकरांच्या पुष्कळ दिवस तालमी मिळाल्या त्या दोन भूमिकांच्या – प्रेमध्वज आणि हरिश्चंद्र, या दोन भूमिकांच्या शिक्षणाची जी शिदोरी, काकासाहेबांनी गांठी बांधली त्या जोरावरच आतांपर्यंतचा माझा नाटचप्रपंच मी करूं शकलों. नाटचशिक्षणांत शद्ब, स्वर, श्वसन, अर्थ, आविर्भाव व

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सर्वांत महत्वाचें मनन, यावर खाडीलकरांचा फार भर असे.' दात्यांचा हा अभिप्राय पाहिल्यावर, खाडील-करांच्या शिक्षणपद्धतीनें मराठी रंगभूमीला किती वरच्या दर्जावर नेऊन ठेवलें, याविषयीं कोणालाही अचूक अनुमान काढतां येईल. सवतीमत्सर नाटकाचें लेखन चालू असतां मी आणि दाते, खाडीलकरांच्याकडे एकदा सहज गेलों होतों. त्यावेळीं त्यांच्या तोंडून कैकयी आणि मंथरा या पात्रांच्या स्वभावाचें मार्मिक विवेचन मी ऐकलें आहे. म्हणून त्यांच्या भूमिका–विवेच-नाच्या विषयीं दाते आणि गंधर्व जें म्हणतात, तें माझ्या मतें तरी तंतोतंत खरें आहे.

देवलांचे समकालीन दिग्दर्शक आणि निर्माते म्हणजे स्व. हि. चिंतक मंडळीचे मालक जनूभाऊ निमकर. १९०३ पासून १९०९ पर्यंत माझा त्यांचेशीं मधून मधून संबंध येत गेला. याच मुदतींत मी शारदा, कुंजविहारी वगैरे नाटकें पाहिलीं. त्यांच्या निकट सहवासांत आलेले लोक सांगतात कीं, मराठी नाट्य-वाङ्मय, गीता, भागवत, योग–वशिष्ठ वगैरे ग्रंथ त्यांनी चांगलेच अभ्यासले होते. त्यांना इंग्रजी येत नव्हतें तरी कोणत्याही विषयावर ते चर्चा करूं लागले कीं ऐक-णारा क्षणभर दिपूनच जाई. प्रथम ते उर्दू कंपनींत होते. नंतर किर्लोस्करांत त्यांनी भाऊरावांशेजारी स्त्री भूमिका केल्या होत्या. त्यांची चिमणीची भूमिका चांगलीच गाजली. अशा या विद्वान नट–दिग्दर्शकाशीं, कुंजविहारी नाटकांमुळें वरेरकरांचा संबंध आला. वरेरकर त्यांच्याविषयीं लिहितात, 'अभिनय शिक्षक या नात्यानं जनुभाऊंच्या तोडीची व्यक्ति मराठी रंगभू-मीच्या इतिहासांत क्वचितच आढळेल. नाटक बसव-ण्याची शास्त्रोक्त पद्धती मीं केवळ त्यांच्यापासूनच शिकलों. स्पष्ट आणि स्वाभाविक, वर्ण आणि अक्षरें यांच्या उच्चारावद्दल त्यांचा मोठा कटाक्ष असे. लयबाज गद्य जनुभाऊंनीच शिकवावें. ते स्वतः मोठेसे गायक नसले तरी इतरांना गायनाचं शिक्षण देण्यात त्यांचा हात धरणें, मोठमोठ्या गवयांनासुद्धां कठीण गेलें असतें. नावाजलेल्या गवयांना बोलावून त्यांचीं गाणीं करायचीं-त्या प्रत्येकाच्या गायन पद्धतींतील बारकाया, गायक नटांना शिकायला लावायच्या, असा त्यांचा नित्याचा परिपाठ असे. रंगभूमीवरची मोजकी हालचाल, रेखीव भाषा, मोजकें गायन, आणि काटेकोर अभिनय शिकव-णारा, त्यांच्या तोडीचा दुसरा माणूस मी पाहिला नाही. अभिनयाच्या सूक्ष्म छटा दाखवण्यांत ते अगदीं सिद्ध-हस्त होते. प्रत्येक वाक्याचेच नव्हे तर प्रत्येक शद्वाचे, त्या शद्वाप्रमाणे असलेल्या अर्थाचे पूर्वापार संबंध दर्शवून, रहस्य समजावून देण्याचें काम ते मोठ्या कसोशीनें करीत. संथा देणं त्यांना आवडत नसे. प्रत्येक नटानं आपल्या शारीरिक आणि बौद्धिक मगदुराला अनुसरून कोणत्याहि भूमिकेचा अभिनय निरनिराळ्या प्रकारें करावा, सक्तीनं त्याला नुसतं अनुकरण करायला लावूं नये असें त्यांचें मत होतें. त्याच अनुरोधानें ते तालीम घेत. शिकवल्याच्या बाहेर कोणताहि नट, एवढेंसं जरी जादा गाऊं लागला,तर फाडकन् थप्पड द्यायला ते माघार घेत नसत. नट वयस्क असला तर या थपडी ऐवजी त्याला जनुभाऊंच्या तोंडची अस्सल शिवी ऐकावी लागे' वरेरकरांचें हें सर्व वर्णन, अगदीं खरें आहे. या थपडीच्या प्रयोगांतून केशवराव भोसलेही सुटले नव्हते असें मी विश्वसनीय रीत्या ऐकलें आहे.केशवराव भोसले, राजाराम सोहनी, विष्णू पागनीस वगैरे नट जनुभाऊं-नीच तयार केले. त्यांच्या तालमींतून निघालेल्या शारदा आणि कुंजविहारी या दोन नाटकांच्या प्रयोगांनी त्यावेळच्या प्रेक्षकांना अक्षरशः वेड लावलेलें मी माझ्या डोळ्यांनी पाहिलें आहे. त्यांच्या तालमीमुळे कृष्णराव गोरे यांनी रमण, विष्णूपंत पागनीस यांनी राधा आणि राजाराम सोहनी यांनी पेंद्या या भूमिका निर्माण केल्या.

महाराष्ट्र नाटक मंडळीला गणपतराव भागवत हे एक उत्कृष्ट नट आणि दिग्दर्शक लाभले होते. त्यांच्या शिक्षणपद्धतींची तारीफ खुद्द खाडीलकरही करीत असत. ते कांही दिवस उमरावतीस आमचेच घरी बिऱ्हाडानें होते. दिवसा कोणती तरी चांगली कादंबरी वाचायची आणि रात्री आम्हाला ती सरसतेनं कथन करायची हा त्यांचा त्यावेळचा व्यवसाय. प्रत्येक नटाला हा रसाळ कथनाचा अभ्यास आवश्यक आहे असं ते म्हणत. इकडच्या आणि पाश्चात्य नाट्याचा आणि अभिनयकलेचा त्यांचा दांडगा व्यासंग होता. ते अत्यंत अभ्यासू होते. बसवायला घेतलेल्या नाटकाचा ते सर्व तऱ्हेनें प्रथम अभ्यास करीत आणि नंतर ते नटांना तालीम देत. प्रत्येक गोष्ट पूर्वयोजनेनुसार ते करून घेत. म्हणून त्यांच्या तालमींतून बाहेर आलेला नाट्यप्रयोग तालबद्ध, लयबद्ध आणि प्रसंगांना योग्य अशा रसानुकूल गतीनें होत असे. प्रयोगांत अथपासून इतिपर्यंत एक क्षणभरही कोठें dullness निर्माण होत नसे. जमिनी-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर खडूनं आडव्या उभ्या रेघा पाडून पात्रांची हालचाल बंदिस्त करून घेण्याची त्यांची पद्धत होती, असें म्हणतात. भूमिकेचा काटेतोल आविष्कार करून घेण्यांत ते विशेष लक्ष घालीत. मात्र महाराष्ट्र मंडळींतील नटांची उच्चारपद्धति कमी जास्त प्रमाणांत कृत्रिम असे. म्हणून तिला "महाराष्ट्र छाप वाणी" असें नांव पडलें होतें. तें कांहीहि असलें तरी महाराष्ट्राच्या नटवर्गाचा अभिनयाचा दर्जा उंचावण्याचं श्रेय खाडीलकरांबरोबर भागवतांनाही दिलं पाहिजे. भागवताच्या या पूर्वनियोजित शिक्षणपद्धतीमुळे एकदा एक मजेदार प्रसंग घडला. एकदा एक खालच्या दर्जाचा नट त्यांचेबरोबर रंगभूमीवर काम करीत असतां, त्याच्या डोक्यावरची १४ लाईनची बत्ती पेटली. दोनतीनदा त्याला हळूच सूचना देऊन भागवतांनी ती विझवायला सांगितली. तेव्हां तो नट "हे बत्ती विझवणं तालमींत शिकवलं आहे कां ?" असा जोरानं सवाल करतां झाला, आणि तें ऐकून प्रेक्षकांत हास्याचा कडेलोट झाला. दाते हे मालक झाल्यावर तालीम मास्तरही झाले. विविध स्वभावांच्या भूमिकांचा अभिनय नटांना ते तालमीत उत्तम तऱ्हेनं करून दाखवतात. सीतारामपंत जोशी हे नट म्हणून पुढे आले ते दात्यांच्या तालमीमुळे.

नटांना भूमिकेचें यथातथ्य ज्ञान करून देण्याचें खाडीलकर आणि जनुभाऊ यांचें कौशल्य अण्णा कारखानीस यांनी घेतलेल्या माझ्या नाटकांच्या तालमींत मला प्रकर्षानें दिसून आलें. रंगभूमीवर चमकलेल्या नटांमध्यें, अण्णांच्या इतका वुद्धिमान, चतुर, विद्वान आणि वहुश्रुत असा दिग्दर्शक माझ्यातरी पहाण्यांत नाही. नटाच्या डोक्यांत तो करीत असलेल्या भूमिकेविषयीं आणि अभिनयकलेविषयीं पुष्कळ भ्रम असतात. ते अगोदर काढून टाकावें लागत असतात; असं ते मला एकदा म्हणाले होते. नटाचें वैशिष्ट्य अचूक रीतीनें हेरून, त्याची जाणीव त्याला करून देऊन, त्याचा विकास करण्याचे कामीं ते सिद्धहस्त आहेत. 'तारामंडळ'मध्यें नायिकेचें काम बापूराव राजहंसांना दिलं. आणि भामिनीचं काम दिलं मामा भटांना. तेव्हां भट नाराज होऊन तालमीकडे दुर्लक्ष करूं लागले. तेव्हां त्यांना भामिनीच्या कामाचं महत्वं अण्णांनी शांतपणें समजावून दिलं. आणि या कामामुळें तुम्ही कीर्ति मिळवाल असंही सांगितलं. त्यानंतर भट तालमीकडे लक्ष देऊं लागले आणि मजा अशी की, तारामंडळाचे शेवटचे तीन अंक केवळ भामिनीच्या कामामुळं रंगत. भटांनी ती भूमिका निर्माण केली. रंगभूमीचा ऱ्हास होण्याचें एक महत्वाचें कारण म्हणजे चांगल्या नव्या नाटकांचा तिला सतत पुरवठा झाला नाही असें सांगण्यांत येतें. आणि त्यांत तथ्यही आहे. मात्र या बाबतींत कारखानीसांची कामगिरी मराठी नाट्याच्या इतिहासांत अद्वितीय अशीच ठरेल. १९११ सालानंतर खाडीलकर – गडकरी हे संगीताकडे वळले. अप्पा टिपणीससकट १०।१२ ख्यातनाम असे नट त्याच सुमारास महाराष्ट्र मंडळींतून निघून गेले; आणि त्यांनी निराळी कंपनी काढली. अशा आणिबाणीच्या वेळीं धीर खचूं न देतां, वासुदेवशास्त्री खरे, शं. प. जोशी इत्यादि नाटककारांचीं नाटकें, आपल्या वुद्धि आणि रचनासामर्थ्यानें सुधारून घेऊन प्रयोगदृष्ट्याहि ती अण्णांनी यशस्वी केली. माझ्या अरुणोदय आणि सरलादेवी या दोन्ही नाटकांत महत्वाच्या सुधारणा अण्णांनीच करून घेतल्या. अशारीतीनें आपल्या कारकीर्दीत नवीन नाटककार निर्माण करून, नवीन नाटकांचा पुरवठा त्यांनी रंगभूमीला केला. जनूभाऊंच्या तालमीत तयार झालेले मामा वरेरकर हे एक चांगले दिग्दर्शक आहेत. दिग्दर्शक या नात्याने केशवराव भोसले यांची मला अधिकृत माहिती नाही. पण रंगभूमीची वास्तव सजावट कोल्हापूरच्या आनंदराव पेंटरांच्या सहकार्यानं त्यांनीच प्रथम केली. नेपथ्यांतही सुधारणा केल्या. ही प्रथा पुढे पेंढारकरांनी चालू ठेवली. याचा परिणाम म्हणून इतर नाटकमंडळींच्या रंगभूमीच्या सजावटींतही सुधारणा दिसूं लागली. यादृष्टीनें मामा वरेरकर यांचेही प्रयत्न, त्यांच्या कुंजविहारी नाटकापासूनच, थोडयाफार प्रमाणांत सुरूं होते. निर्माता म्हणून केशवरावांनी केलेली ही कामगिरी वहुमोल आहे यांत शंका नाही. चिंतामणराव कोल्हटकर, अत्रे आणि रांगणेकर हेही चांगले दिग्दर्शक आहेत. परंतु त्यांचे कामगिरीविषयीं मला प्रत्यक्ष माहिती नाही. त्यांनी तालीम दिलेल्या नाटकांच्या प्रयोगावरूनच अनुमान काढायचें, म्हणजे हे नाट्यप्रयोग चित्ताकर्षक आणि परिणामकारक होतात एवढं मात्र सत्य आहे. जनूभाऊ, खाडीलकर, भागवत, आणि कारखानीस यांच्या दिग्दर्शन कौशल्याचें आज मी केलेलें विवेचन, भावी दिग्दर्शकांस मार्गदर्शक ठरो.

— नागपूर नभोवाणी केंद्राच्या सौजन्यानें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भातील कांही लोकगीतें

लेखक : ना. रा. शेंडे

सारस्वती जन्म भू: म्हणूनच नव्हे तर संतभूमि म्हणूनहि विदर्भाला अखिल महाराष्ट्रांत मानाचें स्थान आहे. या प्रदेशांतील 'वऱ्हाडी भाषा' ही जशी वैशिष्ट्यपूर्ण आहे तद्वत्‌च 'वैदर्भी रीति'हि विशेषत्वानें मानली जाते. जीवनांत लागणाऱ्या अन्न आणि वस्त्र या दोन गोष्टींपैकी विदर्भानें राष्ट्राला वस्त्र-दान केलं आहे. विपुल कापूस पिकणारा सोन्याचा तुकडा म्हणून तर या प्रदेशाची भारतभर ख्याति आहे. अर्थात्‌च अंगाला वस्त्र पुरविणाऱ्या या विदर्भांत खेडुतांच्या विविध जीवनाचें आणि चालीरीतीचें मूर्तिमंत प्रतिबिंब उमटेल, अशीं अनेक लोकगीतें आहेत. या लोकगीतांतून भाषा आणि संस्कृति यांचें जसें प्रकर्षानें दर्शन घडते तसेंच वैदर्भी रीतीची घडण देखील प्रतीत होते.

हें एक निसर्ग-गीत पहा-

ग्रीष्मऋतु संपत आला आहे. वारा सारखा घोंगावतो आहे. झाडें निष्पर्ण झालीं आहेत. हें पाहून वनपांखराचं मन उदास झालं आहे.

वारा वाहावत झाळाले नाई पान
जंगलच्या पांखराचं उदास झालं मन

आता पावसाच्या सरीवर सरी पडूं लागल्या. शेतीवर काम करणारांची धावपळ सुरू झाली. पोपटानं दंवडी पिटली-

पानी पावसाच्या मोकलल्या धारा
कळंवाच्या झाळाखाली तिफनी उभ्या करा

सेताच्या बंदानं पपुया-राज बोले-
दिस पेरनीचे आले

आणि मग रात्रभर धो धो पाऊस पडूं लागला. चारी दिशा धुंद झाल्या. कांही ठिकाणीं जोरदार वृष्टि होत असली तरी आपल्या भावाच्या शेतावर मात्र सोळा आणे पीक येईल असाच पाऊस पडत आहे, याचा वहिणीला अभिमान वाटतो-

पानी पळते गरजू गरजू रातीं
माह्या बांधवाचा वइल वलंग्याच्या सेतीं

पानी पळते कुनीच्या कुनीकळे
वंधूच्या सेताकळे मोत्याचा सिरव पळे

'मोत्याचा सिरव पळे' या शब्दांनी केवढा अर्थ स्पष्ट केला आहे ! असेच मोठे सूचक अर्थपूर्ण शब्द गीतांत ठिकठिकाणीं विखुरले आहेत. आता हा भावपूर्ण कल्पनाविलास पहा-

काया वावरांत तिफन नवरी
जानोसा देल्ला सुताराच्या दारीं

काया वावरांत तिफन हुटली
माह्या बांधवानं साखर मूठीनं वाटली

पानोथ्याच्या नारी उचला घागरी
माह्या बांधवाच्या सेती चालल्या पांभरी

नांगरानं नांगरलं वखरानं वखरलं
तिफनी बाईले सिंगारून सेती नेल्लं

कापसाच्या पिकाला काळी कसदार जमीन लागते. तिफणीनें ती पेरणीयोग्य करावी लागते. म्हणूनच शेत आणि तिफण यांचा अन्योन्य संबंध लक्षांत घेऊन नवरा-नवरीची उपमा दिली गेली आहे. तिफणीला सुताराच्या घरीं जानोसा दिला म्हणजे सुताराशिवाय तिफण तयार होत नाही, तिची दुरुस्ती त्यालाच करावी लागते हा सुंदर भावहि या पक्तींत दर्शविला आहे. नांगर, वखर आणि तिफण हीं साधनंच शेतकऱ्यांचं मोठं धन आहे. त्यांच्या बळावरच तो आपल्या शेतीची उत्तम मशागत करतो. अर्थात्‌च त्या साधनांची

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याला काळजी घ्यावी लागते. तीं मजबूत राखूनच तो नांगरणं वखरणं करतो, याची जाणीव देखील या गीतांत व्यक्त करण्यांत आली आहे. आता या गीतांतील पुढील बहारदार पंक्ति पहा–

पानी पाऊस आला गरजत
पानोथ्याच्या नारी उभ्या केल्या दरोज्यांत

पानी पाऊस उठला काया कोट
धर्तरी माता नेसली हिरवा जोट

पड पड पान्या येऊं दे भाजीपाला
दुबया म्हनते मायबाप आला

मेघ नवरदेव इज वऱ्हाळनी
त्याहीच्या जोरानं नंद्या चालल्या भरुनी

नंदीले आला पूर नंद मारते उकाया
तिच्या भर्तारानं जटा सोळल्या मोकया

नंदीले आला पूर वाहून आल्या जायाजुया
कोंढल्या भावयया उळी टाका भाऊराया

पुरनाईले पूर नावाळे कोठी गेले
बहिनाईच्या गाई जाता भाऊ झोपनार झाले

पुरनाई थळीचे भाऊ माहे धावनार
नाई भिजूं देल्ला रानीचा सिनगार

या पंक्तींत बहिणीच्या प्रति भावाचं कर्तव्य काय याची मोठ्या कुशलतेनं छाननी करण्यांत आली आली आहे. खूप पाऊस पडला. नद्यांना भयंकर पूर आला. बहिणीच्या गायी त्यांत सापडल्या. त्यांना वाचविण्यासाठी नावाड्यांचा पत्ता नाही. पण भावांनी त्या वाचवायला पाहिजे, तें त्याचं कर्तव्य तो पार पाडू शकला नाही तर त्याला ही गोष्ट लाजिरवाणी आहे. परंतु पुरासारखा कोणताहि कठीण प्रसंग आला तरी तो जीवाची पर्वा न करतां नुकसान होऊं देणार नाही, याची खात्रीहि वहिणीला पुरेपुर असते. हीच ती वैदर्भी अस्सल रीत आहे–खरा धर्म आहे.

आता, कापसाचीं शेतं फुललीं आहेत. स्त्रिया कापूसवेचणी करीत आहेत. वेचतां वेचतां त्या दमल्या आहेत. आपला थकवा हलका करण्यासाठी त्या गातात आणि शेतीवाडीवर राबणाऱ्या आपल्या नातेवाईकांसंबंधी अभिमानाचे उद्गार काढतात.

कापूसवेचणीच्या या गीतारंभीं त्या कापूस मोजून घेणाऱ्याला बोल देऊन म्हणतात –

कापूस येचूनी दुखती नख–बोट
कापूस मोजणाऱ्या नोको लावूं मनगट

कापूस येचूनी परखाटी पळली सूनी
कोनाचं नाई कोनी समज धरा मनीं

नखंबोटं दुखेपर्यंत कष्ट घेऊन आपण कापूस वेचित आहोंत आणि वेचलेला कापूस मोजून घेणारा दांडी मारून खोट करीत आहे, हें पाहून त्यांचा आत्मा तळतळतो. कितीहि कष्ट घेतले व इमानदारीने काम केलें तरी त्याचं कोणी मोल करीत नाही – कोणी कोणाचा नाही, असा स्वानुभव त्या व्यक्त करतात. कष्टानं त्या निःश्वास टाकतात –

कापूस येचीन पर्खाटी धरून
माये तुहं गोत नाय् वळखलं दुरून

कापूस येचून येचून दुखते कंबर
भाऊ माह्या तुह्या नांवाचे नंबर

वलांग्याच्या सेती जागले जागले
भावाच्या सेतामंधी मोती कनसाले लागले

अशा अभिमानाच्या शब्दानी आपले कष्ट हलके करून त्या भावाच्या शेतीचा गौरव करतात. कांही झालं तरी आपल्या भावाच्या शेतीचं उत्पन्न अधिकाधिक वाढावं व तो सुखानं रहावा, अशी त्या इच्छा बाळगतात.

सुनेला सासुरवास कुठं जाचक होत नाही ? मग विदर्भ तरी त्याला कसा अपवाद राहील ! सासूच्या जांचामुळं सासूरवाशीण मुलीला आईची तीव्र आठवण होते. तिचं दुःखीकष्टी मन आईच्या भेटीसाठी आतुर होतं. कितीहि त्रास झाला तरी आईला भेटीनच असा ती निर्धार करते. हृदयस्पर्शी अनेक दाखले देत ती गाते–

तुह्या जीवासाठी घार गंगनाची व्हईन
पर पक्ष्याचे लावून तुह्या भेटीले येईन

तुह्या जीवासाठी गंगनाची व्हईन घार
लागन् उनवारा माह्या सावलीनं चाल

तुह्या जीवासाठी व्हईन जंगलाची चिमनी
मायाच्या मयांत तूं बाग मी निंबोनीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुह्या जीवासाठी व्हईन जंगलचं पारव
मायाच्या मयांत तूं मळा मी बारव

तुह्या जीवासाठी जीव देईन मोपला
भाऊ माहा चापा नवतीचा एकला

तुह्या जीवासाठी देईन मी जान
खालीं तुहं शीर वरति ठेवीन माहो मान !

माहेरीं असतांना आईनं आपल्याला किती ममतेनं, किती सुखानं वाढवलं— आपली किती काळजी घेतली याची आठवण होऊन तिचं हृदय भरून येतं. ती माहेरच्या सुखाचं कौतुक करते—

माय तुह्या घरीं राज केल्लं लेकावानी
तांब्याभर पानी पित्याची व् मांगनी

माय तुह्या घरीं राहून राज केल्लं
तांब्याभर पानी तुह्या हातीं नाई देल्लं

माय तुह्या घरीं राज केल्लं रावनाचं
नाई उचललं ताट तुह्या जेवनाचं

मायवाई तुह्या घरीं धंदा नाई केला
रांजनाचं पानी वापरतां शिन गेला

आपल्या आईनं आपल्यासाठी खूप त्रास घेतला, कसली उणीव पडूं दिली नाही; पण आपण मात्र आपल्या जन्मदात्रीला कांहीच सुख दिलं नाही, कसलीच मदत केली नाही याचा मुलीला पश्चाताप होतो. आपल्या आईनं आपलं कसं कौतुकच केलं याचं सुंदर चित्र ती रेखाटते—

कुरया केसाची तोंडावर सावली
कोन्या गली गेल्ली लेक चंदनबावली

लेक माही गोरी सावया तिचा पती
झाकून गेली बाई मानीं कारवाले योती

आंब्याच्या अंबराईत पाड खाल्ला राघोनं
नेनत्या बागवाना गेली निंदरा लागून

सासूच्या कचाटयांत सून पिरगळली गेली म्हणजे तिचा विव्हळणारा आत्मा कठोर शद्बांत उद्गारतो—

बोलनीच्या पायीं मन इटलं किटलं
वाऱ्याच्या सुतानं पान केईचं फाटलं
सासूचा सासुरवास सरपाची लह्येर
नंदेचा सासुरवास इचा मांडला कहर

पण, सासूचा सासुरवास कितीहि जाचक झाला तरी तो सहन करून गोड मानावा, अशी बाप मुलीला शिकवण देतो म्हणूनच—

बाप म्हने लेकी सासुरवास करा
उसाचं टेर चरख्यांत झाला चुरा

सासूचा सासुरवास नंदच्या लावन्या
बाईचा कंठ माह्या करे सपादन्या

सासूचा सासुरवास कठली जिवावर
पित्याच्या नावाखालीं निजली सेवावर

बापाची शिकवण व माहेरची रीत लक्षांत घेऊन मुलगी सर्व कांही मोठं मन करून सहन करते —

सासू सिव्या देते सूनीच्या बापाले
लागले पनाये मंजेरी चाफ्याले

भावाच्या सेजारी बहीण बसली विजली
दुखाच्या सांगे गोठी खाली धरणी भिजली

सासूचा सासुरवास मिरच्याचे दाने
अशीलाचे सोसे कमशीलाचे काय जानें

सासूचा सासुरवास नंदेचे टेन आले
हातचे कांकण करवतानं झाले ढिले

मुलीच्या मनांत काहूर माजतं. तिची द्विधा मनःस्थिति होते. आपल्याला असा त्रास होत असतांना आपल्या आईबापानं भेटायला यावं अशी तिची अपेक्षा असते. माहेरचीं माणसं भेटायला आलीं नाहीत की ती मनांतल्या मनांत त्यांना बोल देते; पण लगेच आईबापाच्या प्रेमळपणाची आठवण येऊन ती गहिंवरते; आणि मग ती आपली कृतज्ञता व्यक्त करते —

वाट पाहूं पाहूं डोये झाले कुकावानी
येव्हळी तुही मया काहून झाले लोकावानी

निंबाच्या निंबोया निंबाखाली पसरती
भांडाले झाल्या लेकी बहिनीले इसरती

माय तुही मया घराच्या दारालोक
बापाजीची मया आली डोंगर चिरत

आईचे उपकार तर फेडतां येतील पण बापाचे उपकार मात्र कधीच फेडतां येणार नाहीत याची जाणीव होऊन ती म्हणते —

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मायेचा उपकार फेळीन चोईडोई
पित्याचा उपकार सिरीं वझं झालं बाई

मायेचं उसव फेळीन आल्या गेल्या
पित्याचा उसव फिटे न काई केल्या

आणि मग ती आईबापाची महति गातें –

बापाजी राजा माह्या काशींतला वड
माही मायबाई पानी तिरगुनीचं गोळ

बापाजी राजा आमराईचा पाड
माही मायबाई खिरनी मोठी गोळ

बाप माहा चाफा माय माही चक्रसेला
आठवूं नाई देल्ला उन्हाया कसा गेला

बाप माहा चाफा माय करवंद
केईचं पान रुंद सावली कडीवंद

अशा प्रकारचीं कितीतरी सुंदर, उदात्त आणि बोधप्रद लोकगीतं ग्रामीण जीवनाचं, रीतिरिवाजाचं अन् कामधंद्यांचं दर्शन घडवून, मन प्रसन्न करतात.

शब्दार्थ : वाहावत – घोंगावतो; मोकलल्या – पडूं लागल्या; वंदानं – बांधानं, धुऱ्यानं; पपुया – पोपट; बइल – बैल; सिरव – शिरवा; काया वावरांत – काळी जमीन असलेल्या शेतांत; पानीथ्याच्या – पाणवटयाच्या, घाटाच्या; पांभरी – प्रवाहांत; सिंगारून – शृंगार करून; दरोज्यांत – दारांत; काया कोट – काळाकुट्ट; जोट – किमती लुगडें; दुवया – दुर्वांकुर; उकाया – उकळचा; मोकया – मोकळचा; जाया जुया – जाईजुई; कोंढल्या – कोंडल्या गेल्या; पुरनाईले – पूर्णा नदीला; नावाळे – नावाडी; थळीचे – थडीचे, किनाऱ्याचे; सिनगार– शृंगार.

परखाटी – पऱ्हाटी; गोत – नातेवाईक; वळखलं – ओळखलं.

गंगनाची – आकाशाची; पर – पंख; मयांत – मळचांत; पारव – पारवा; वारव – पाण्याचा ओघळ; मोपला – माझा; जान – जीव.

सिन – शीण, थकवा; कुरया – कुरळचा; चंदनबावली – चंदनाची पुतळी; सावया – सावळा; मानीं – मानेला; कारवाले – कारवारी; नेनत्या – जाणत्या; निंदरा – निद्रा, झोप.

इट्लं किटलं – कंटाळलं; केईचं – केळीचं; सरपाची – सर्पाची; टेर – दांडा, कांडकं; लावन्या– चुगल्या करी सपादन्या – सहन करी; कठली – वेतली; माह्या – माझ्या; सेवावर – पदरावर; पनाये – निखारे; विजली – वीज; गोठी – गोष्टी; टेन – टोमणा.

डोये – डोळे; कुकावानी – कुंकवासारखे लाल; मया – माया; इसरती – विसरतात; दारालोक – इतर लोकांवर; चोईडोई – चोळीबांगडी; वझं – ओझं; उसव – उसणें, ऋण; तिरगुनीचं – त्रिवेणी संगमाचं; गोळ – गोड; चक्रसेला – भरजरी शालु; उन्हाया – उन्हाळा; कडीवंद – घट्ट.

प्रस्तुत लोकगीतांच्या बाबतींत खामगावच्या श्रीमती सखूबाई सुरडकर यांची मोलाची मदत झाली असून, नागपूर आकाशवाणीने तीं ध्वनिमुद्रित केलीं आहेत. लेखक त्यांचा आभारी आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माणूस आणि कला

लेखक : पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

दिल्लीहून 'Thought' या नावाचें एक इंग्रजी साप्ताहिक प्रकाशित होत असतें. त्याच्या दि. १२ जूनच्या अंकांत 'The Aesthetics of Nicolai Hartman' या मथळ्याचा, श्री. एम्. ए. व्यंकटराव यांनी लिहिलेला एक मननीय लेख प्रकाशित झाला आहे. या लेखांत **निकोलाय हार्टमन** या जर्मन तत्त्ववेत्याचे 'सौंदर्य दृष्टि' या विषयावरील विचार दिग्दर्शित करण्यांत आले आहेत. निकोलाय हार्टमन याचा नीतिशास्त्रावरील ग्रंथ गेलीं वीस वर्षें जगासमोर आहे. पण त्याकडे अलीकडेच पाश्चात्य विचारवंतांचें लक्ष जाऊं लागलें आहे. इतकें की, आता अनेक विद्वान असें म्हणूं लागले आहेत की, आधुनिक जर्मनीचा सर्वात मोठा दार्शनिक व तत्त्ववेत्ता जर कोणी असेल तर तो निकोलाय हार्टमन हाच होय.

हार्टमनच्या सौंदर्यदृष्टीचा एक आकर्षक विशेष हा आहे की, त्या दृष्टीची प्रेरणा व प्रमेयें यांची जुळणी करून एक समग्र सौंदर्यदर्शन तयार करूं लागतां पुरातन भारतीय दार्शनिकांनी साकार केलेल्या भव्योदात्त जीवनदर्शनाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. अलीकडे वर्ष – दोन वर्षें माझें लक्ष भारतीय षड्दर्शनांच्या अभ्यासाकडे ओढलें जाऊं लागलें आहे. आणि या दृष्टीने मी जें वाचन – मनन करूं लागलों आहे त्यांतून एक विस्मयजनक निष्कर्ष बाहेर डोकावूं लागला आहे. तो असा: आम्ही, म्हणजे आधुनिक भारतीय विचारवंतांनी, केवळ सनातनी, सांप्रदायी व प्रगतिशून्य म्हणून दूर फेकून दिलेलें पुरातन भारतीय तत्वज्ञान हेंच आता अनेक पाश्चात्य विचारवंतांचें स्फूर्तिनिधान बनूं पाहत आहे. इतकें की, आधुनिक जगापुढें वैज्ञानिक व जडवादी वैचारिकांच्या संघर्षामुळे ज्या भीषण समस्या आज जगासमोर उभ्या झाल्या आहेत व ज्यांमुळे मोठमोठ्यांची मति गुंग होऊन गेली आहे त्या भीषण समस्यांचा भेद करून प्रगतीची नवी दिशा दाखविण्याचें सामर्थ्य केवळ भारतीय तत्त्वज्ञानांत व जीवनदर्शनांतच साठलेलें आहे, असें आता अनेक पाश्चात्य विचारवंतांना व कलावंतांना दिसून येऊं लागलें आहे. आधुनिक विज्ञानाच्या प्रभावामुळे उदयास आलेल्या व जगभर प्रसार पावलेल्या सर्व विचारप्रणाल्या आता स्वतः भोंवतींच गिरक्या घेऊं लागल्या आहेत व फोनोग्राफच्या तडकलेल्या तबकड्यांप्रमाणें तेच ते कंटाळवाणे सूर त्या आता काढूं लागल्या आहेत. केवळ स्वतः भोंवतींच गिरक्या घेत राहणें यांत **'गति'** असली तरी ती **'प्रगति'** खास नव्हे, याची आता अनेक पाश्चात्य विचारवंतांना जाणीव होऊं लागली आहे. आणि या जाणिवेमुळे नव्या जीवनदर्शनाचा जो शोध त्यांनी चालविला आहे तो त्यांना आपोआप पुरातन भारतीय जीवनदर्शनांच्या भव्योदात्त मूल्यांकडे नेत आहे.

निकोलाय हार्टमनचे सौंदर्य दृष्टीवरील विचार वाचून मला असें वाटूं लागलें आहे की, आधुनिक वैज्ञानिक व यंत्रयुगानें ज्या वैचारिक व व्यावहारिक समस्या जगासमोर उभ्या केल्या आहेत व ज्या आता समग्र मानवजातीला व मानवी संस्कृतीला गिळंकृत करूं पाहत आहेत त्यांचें मूळ एकाच गोष्टींत साठलें आहे. ती म्हणजे **माणूस आणि त्याची निर्मिति यांची ताटातूट.** माणूस आणि त्याचें ज्ञान, माणूस आणि त्याची कला, माणूस आणि त्याची व्यावहारिक करामत यांच्यांत भेद करून, माणसाला तुच्छ लेखीत जाणें आणि त्याच्या निर्मितीला व करामतीला अवास्तव महत्त्व देऊन अधिक प्रभावी निर्मिति व अधिक प्रभावी करामत यांच्या मृगजळामागें धावत सुटणें, या प्रवृत्तींतूनच सर्व आधुनिक समस्या उदयास आल्या आहेत, असें सूक्ष्म विचारांतीं कोणासहि दिसून येईल.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकदा एक यंत्र काढलें की, जी एक परंपरा सुरू होते तिला एकापेक्षा अधिक सरस, अधिक प्रभावी यंत्र एकसारखें संशोधित राहणें, असें स्वरूप अपरिहार्य-पणें प्राप्त होतें. वाफेच्या शक्तीमुळे चालणाऱ्या यंत्रांची विजेच्या शक्तीमुळे चालणाऱ्या यंत्रांत परिणति घडून येणें आणि आता परमाणु-स्फोटकांतून निर्माण होणाऱ्या प्रचंड शक्तीचा वापर करू शकणारीं यंत्रें निर्माण करण्या-कडे जगाचें लक्ष केंद्रित होणें, ही जी परंपरा सुरू झाली आहे तिला अंत नाही. ही परंपरा मानवाचा कायमचा अंत करून टाकल्यानंतरच संपुष्टांत येणारी आहे.

हाच प्रकार साहित्य व कला यांच्या क्षेत्रांतहि आढळून येतो. मुद्रण यंत्रांची अखंड वाढती भूक शम-विण्याच्या इराद्याने विविध प्रकारचें साहित्य प्रचंड प्रमाणांत प्रत्यहीं प्रकाशित केलें जात आहे. आणि तरीहि यंत्रांची भूक न शमल्यामुळे नवनव्या साहित्य-प्रकारांच्या शोधांत मानवी बुद्धि खर्ची पडत आहे. माणसांचें, कलावंतांचेंदेखील, काय वाटेल तें होवो, पण नवनव्या यंत्रांची भस्मासुरी भूक शमविण्यासाठी त्यांच्या जबड्यांत आपण प्रवेश केलाच पाहिजे, अशी एक भयानक वृत्ति मानवजातीला सांप्रत पागल बनवूं लागली आहे.

या यंत्रानुगामी व मानवताविरोधी, नव्हे, मानवताविध्वंसक वृत्तीच्या मगरमिठींतून आपली मुक्तता करून घेऊन मानवी कलानिर्मिति व सौंदर्य-निर्मिति यांच्या वास्तविक रूपाकडे पाहण्याचा प्रयत्न निकोलाय हार्टमन याने केला आहे. हार्टमनने सौंदर्य-शास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिला नाही. पण त्याच्या नीतिशास्त्रावरील ग्रंथांतून व इतर लिखाणांतून त्याचे सौंदर्यदृष्टीवरील विचार संकलित करण्याचा प्रयत्न झाला आहे. आणि हे विचार सौंदर्यशास्त्राला अधिक मूलगामी व भरीव स्वरूप देण्यास कारणीभूत होतील. असा विचारवंतांचा कयास आहे.

व्याकुलता

सांप्रत जागतिक महायुद्धांचें युग सुरू झालें आहे. या युद्धांची विध्वंसकता इतकी भयानक आहे की ती पाहून विचारी मानव हतवुद्ध झाला आहे व सहृ-दय मानव व्याकुळ झाला आहे. या व्याकुळतेच्या आत्यंतिक वेदनेंतूनच जे नवे विचार उदयास येत आहेत व नवें जीवनदर्शन आज साकार होत आहे, तेंच उद्या मानवाला प्रगतीचा खरा मार्ग दाखवील. ज्यांना हें युग महायुद्धांचें आहे व मानवनिर्मित प्रचंड संहारक शक्तीच मानवजातीला ग्रासून टाकूं पाहत आहेत याची जाणीवच होत नाही, त्यांना 'व्याकुलता' (Anguish) या शब्दाच्या पोटीं कोणते अर्थ गर्भित झाले आहेत याची कल्पना करतां येणें दुरापास्त आहे. या आत्यंतिक व्याकुलतेचा पाश्चात्य देशांत पहिला पडसाद जो उमटला तो Existentialism (अस्तित्ववाद अथवा सत्-वाद) या नावांच्या नवीन तत्त्वज्ञानांत. कीर्केगार्ड, नित्शे, यास्पर्स, मार्सेल, हायडेगर व सार्त्रे हे या तत्त्वज्ञानाचे प्रमुख पुरस्कर्ते मानले जातात. या नव्या विचारवंतांच्या लेखनाने मार्क्सवादाचाहि मर्मभेद केला आहे. सार्त्रे हा अद्यापहि थोडाबहुत कम्युनिस्टा-नुकूल दिसत असला तरी त्याचे कलात्मक लिखाण मार्क्सवादाचा मर्मभेद करून मानवाची अतीव व्याकुल-ताच अधिक प्रमाणांत दिग्दर्शित करतें.

हार्टमन अस्तित्ववाद्यांच्याहि जरा पुढे गेला आहे. कारण तो केवळ व्याकुलतेवर तिष्ठत न वसता व्याकुळतेच्या तर्कश्रेणीला अधिक विधायक व प्रवृत्तिपर वळण देण्याचा प्रयत्न करतो. अतीव व्याकुळता (Anguish) हीच आता युगवृत्ति झाली आहे. मानवता जिवंत राहील तर ती याच वृत्तीच्या गर्भांतून निर्माण होणाऱ्या नव्या प्रेरक शक्तीमुळे. या महा-युद्धांच्या युगांत ज्याचें अंतःकरण आत्यंतिकतेने व्याकुळ होत नाही त्याची मानवता मेली आहे, असेंच मानलें पाहिजे. पुष्कळांची मानवता हतवुद्धतेमुळे व अस-हायतेमुळे मृतप्राय झालेली आहे. आणि म्हणूनच कलात्मक नवनिर्मिति आता संपुष्टांत येऊं लागली आहे. आधुनिक युगाची भयानक संहारकता पाहून ज्यांचें अंतःकरण आज आत्यंतिकतेने व्याकुळ होतें तेच उद्या मानवतेचे संरक्षक ठरतील.

कलात्मक दृष्ट्या विचार करतां आत्यंतिक व्याकुलता हाच आता मानवतेचा युगधर्म झाला आहे, असें म्हणावें लागेल. या व्याकुलतेच्या आत्यंतिक वेदनेंतूनच नवमानवता साकार होऊं शकेल.

या व्याकुलतेच्या वेदनांमुळे जें नवें विचारचक्र सुरू झालें आहे त्यांतूनच एक नवें जीवनदर्शन साकार होऊं लागलें आहे. 'अस्तित्ववाद' हा या नवजीवन-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दर्शनाचा पाश्चात्य देशांतील पहिला आविष्कार आहे. भारतांत हें नवजीवन दर्शन कलात्मक रूपांत प्रकट न होतां तें गांधीजींच्या महात्मतेच्या रूपाने प्रकट झालें आणि आता तें विनोबांच्या विस्मयजनक कर्तृत्वामुळे वैचारिक व व्यावहारिक वाळसें धरूं लागलें आहे. पण या युगधर्मरूप आत्यंतिक व्याकुलतेचा स्पर्श भारतीय साहित्यिकांना व कलावंतांना अद्याप झालेला दिसत नाही. ते अद्यापहि पाश्चात्यांच्या मृतप्राय विचार-प्रणाल्यांच्याच प्रभावांत गिरक्या घेत आहेत. आणि त्यांच्या निर्जीव अनुकरणांतच धन्यता मानीत आहेत. क्रांतीच्या फुटक्या तुतान्या घेऊन त्यांतूनच नवनिर्मितीचे सूर काढण्याच्या हास्यास्पद प्रयत्नांत ते दंग आहेत.

ही युगधर्मरूप व्याकुलता म्हणजे भावनाविवश केविलवाणें रडगाणें नव्हे. मानवी जगासमोर उभ्या ठाकलेल्या भयानक समस्या पाहून मानवी भवितव्या-संबंधी आत्यंतिक गांभीर्यामुळे वाटणारी जी चिंता तीच या व्याकुलतेची खरी जननी आहे. ही व्याकुलता वैय-क्तिक स्वरूपाची नसून वैश्विक स्वरूपाची आहे. व्यक्ति आणि विश्व यांच्यांतील मूळ नातें शोधण्याची प्रवृत्ति या व्याकुळतेंतून हळुहळू साकार होऊं लागते. आणि म्हणूनच मूलगामी अशा नवविचारांची व नवजीवन-दर्शनाची जननी होण्याची पात्रता या व्याकुलतेंत साठलेली आहे.

सांस्कृतिक आदर्श

हार्टमनच्या व्याकुलतेने त्याला प्रथम नीति-शास्त्राचीं मूलगामी तत्त्वें कोणतीं, याचा शोध घेण्याकडे नेलें. या शोधांत त्याला असें आढळून आलें की, माणूस हा जीवनमूल्यानुगामी प्राणी आहे. हीं जीवन-मूल्यें विशिष्ट परिस्थितींत विशिष्टरूपें धारण करतात आणि त्यांच्या आधारावरच विशिष्ट संस्कृति-प्रकार आकारास येतात. नैतिक मूल्यें आणि कलात्मक अथवा सौंदर्यमूल्यें हीं केवळ बौद्धिक स्वरूपाचीं नसून तीं संस्कृतिनिष्ठ अशीं असतात, म्हणजेच तीं जीवनप्रकारा-नुगामीं असतात, हें हार्टमनच्या संशोधनाचें सार आहे.

नैतिक मूल्यांच्या अधिष्ठानाचा शोध करतां करतां हार्टमनला असें आढळून आलें की, प्रत्येक संस्कृति अथवा जीवनप्रकार कांही विशिष्ट जीवन-विषयक प्रेरणांमुळे विशिष्ट रूप धारण करतो. ह्या प्रेरणांचें स्वरूप प्रत्येक संस्कृतिप्रकारांत आढळून येणाऱ्या आदर्श विभूतींच्या जीवनप्रकारावरून निश्चित करतां येतें. प्रत्येक प्रादेशिक वा राष्ट्रीय संस्कृतींत आदर्श पुरुषांच्या वृत्ति-प्रवृत्तींच्या व कर्तृत्वाच्या सभोवतींच नैतिक मूल्यांचीं वैचारिक व भावनात्मक वलयें निर्माण झालेलीं दिसून येतात.

आपल्या देशांत रामायण महाभारतादि ग्रंथांनी राम व कृष्णाला अवतारी विभूति मानून त्यांच्या चारित्र्याच्या व जीवनप्रकाराच्या आधारावर जीं नैतिक मूल्यें निर्माण केलीं तींच भारतीय संस्कृतीचीं वैशिष्ट्यपूर्ण अशीं जीवनमूल्यें ठरलीं. या मूल्यांचा ठसा भारतीय मनावर इतका खोलवर कोरला गेला आहे की, आधुनिक संघर्षांच्या अनेक आघातांनीदेखील तो अद्याप पुसला गेलेला नाही. अगदी थेट असाच प्रकार इतर अनेक संस्कृति-प्रकारांत आढळून येतो.

नैतिक मूल्यांच्या बाबतींत आदर्श विभूतींचें जें माहात्म्य तेंच कलात्मक मूल्यांच्या बाबतींत आदर्श कलाकृतींना प्राप्त झालेलें आढळून येतें. नैतिक क्षेत्रां-तील आदर्श पुरुष व आदर्श जीवनमूल्यें जीवनाला जसें एक विशिष्ट नैतिक वळण लावण्यास कारणीभूत होतात तशाच आदर्श कलावंतांच्या कलात्मक प्रतिमा समाजांत विशिष्ट सौंदर्यमूल्यें निर्माण करण्यास कारणीभूत होत असतात.

या विवेचनांतील मुख्य मुद्दा असा कीं, बाह्य परिस्थितिपेक्षा आदर्श नेता व आदर्श कलावंत आणि त्यांच्या कर्तृत्वाचे आविष्कार ह्याच प्रत्येक संस्कृति-प्रकारांत वावरणाऱ्या माणसांच्या खऱ्या प्रेरक शक्ति असतात. यांत बाह्य परिस्थितीपेक्षा मानवी व्यक्ति-मत्वांतून आविष्कृत होणाऱ्या नैतिक व कलात्मक मूल्यांच्या आधारावरच सांस्कृतिक वा सामाजिक जीवनमूल्यें साकार होत असतात, ह्या गोष्टीला अधिक महत्त्व देण्यांत येतें. सारांश, नैतिक व सौंदर्य-विषयक मूल्यांचें अधिष्ठान बाह्य परिस्थिति ही नसून परिस्थितीवर मात करणाऱ्या मानवी प्रयत्नांतून उदयास येणारे आदर्श (type-valves) हेच त्या मूल्यांचें अधिष्ठान असतें, असा निष्कर्ष हार्टमनने काढला आहे.

आदर्शानुगामी नैतिक व सौंदर्यविषयक मूल्यांची प्रेरक शक्ति कोणती ? हार्टमनच्या मतें ही प्रेरक शक्ति म्हणजे माणसाला वाटणारी **उदात्ततेची ओढ**. सत्य,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिव, सुंदर यांचे आदर्श प्रत्येक संस्कृतिप्रकारांत वैशिष्ट्यपूर्ण रीतीने साकार झालेले असतात.

या आदर्शांना एक अदृश्य बाजू (diamesion) असते. उदात्ततेची आंतरिक ओढ हीच ती बाजू होय. ही ओढ आदर्शांना अधिक आदर्श स्वरूप प्रदान करीत असते. आदर्श तेच राहतात. आदर्श मूल्यांचें बाह्य स्वरूपहि तेंच राहतें. पण त्यांत, उदात्ततेच्या आंतरिक ओढीमुळे आधिकाधिक आशय ओतला जातो. असा अधिकाधिक भरीव व विविधप्रकारचा नवनवा आशय पुरातन आदर्शांच्या गाभ्यांत ओतला जाणें, हेच प्रगतिशील संस्कृतीचें निश्चयात्मक गमक होय.

आपल्या पारंपरिक सांस्कृतिक आदर्शांकडे पाठ फिरवून परकीयांचे आदर्श आत्मसात करण्याच्या भरीस जे पडतात, ते आपल्या संस्कृतीला तर अंतरतातच पण परकीयांची संस्कृति ते कदापिहि आत्मसात करूं शकत नाहीत. मुळापासून उपटलेलें मोठें झाड पुन्हा जमीनींत खुपसलें तरी मूळ धरू शकत नाही तद्वत् आपल्या संस्कृतीला पारखे झालेले लोक दुसऱ्या कोणत्याहि संस्कृतींत समरस होऊं शकत नाहीत. ते संस्कृतिशून्य अशा भटक्या, मूळ नसलेल्या जमातींत सामील होतात. आणि जसा वारा येईल तसे वाहवत जातात. आधुनिक यांत्रिक युगाने अशा मूल–शून्य (root–less) जमातींची संख्या प्रचंड प्रमाणांत वाढविली आहे. आणि म्हणूनच समग्र मानवी संस्कृति आज भयानक संकटांत सापडली आहे.

जुने दिवे आणि नवे दिवे

आधुनिक यंत्रयुगाने, 'जुने दिवे द्या व नवे दिवे घ्या' अशी घटोत्कची जाहिरातबाजी सुरू केली आहे. नव्या दिव्यांच्या बाह्य झगमगाटाने ज्यांचे डोळे दीपतात व आपले जुने दिवे देऊन टाकून नवे दिवे जे घेतात त्यांची गत 'अलाउद्दीन व आश्चर्यकारक दिवा' या गोष्टींत वर्णन केल्याप्रमाणेच होते. आधुनिकतेच्या आहारीं गेलेल्या अनेक भारतीय व अ-भारतीय बुद्धिवाद्यांची अशीच गत झालेली दिसून येते. आधुनिक साहित्य व कला यांच्यांत अक्षरत्वाचा जो अभाव दिसून येतो त्याचें मुख्य कारण म्हणजे उदात्ततेच्या ओढीचा अभाव, अथवा या ओढीच्या साहाय्याने जुन्या सांस्कृतिक आदर्शांतच नव्या आशयाची भर टाकण्याऐवजी नव्या आदर्शांच्या मृगजळामागे धावत सुटणें अथवा आदर्शांची भाषाच अर्थशून्य मानणें. या अभावनिष्ठ वृत्तींतून निर्माण झालेलें वाङ्मय व कला यांना अक्षर वाङ्मयाचें व अभिजात कलेचें माहात्म्य प्राप्त होणें सर्वथैव अशक्य आहे. सांस्कृतिक प्रगतीच्या प्रक्रियेबाबत आधुनिक यंत्रयुगाने जेवढें भयानक अज्ञान प्रकट केलें आहे तेवढें मानवी इतिहासांत क्वचितच कधी प्रगट झालें असेल.

संस्कृतिनिष्ठ उदात्ततेची ओढ अथवा 'ethos' हीच मानवी प्रगतीची खरी प्रेरक शक्ति आहे. हार्टमन म्हणतो –

"Art takes up the values of the ethos of a people into its substance and gives them palpable form. Art is a language of the ethos which has not its like. The poet has been for the people teacher and educator from time immemorial... The astonishing thing is that in the long run, man always becomes what he admires and wills to become... Art is a second face of man...

"But art does not speak in concepts; it does not call things by name. It beholds and forms what it beholds."

हार्टमन म्हणतो, उदात्ततेच्या ओढीमुळे उदयास आलेल्या जनतेच्या अमूर्त सांस्कृतिक आदर्शांना हातीं धरून त्यांना रंग–रूप – आकार देणें हें कलावंताचें कार्य आहे. याचा अर्थ असा की, उदात्ततेची ओढ संपुष्टांत आली की कला मृतप्राय होते. यंत्रयुगाने कलेला केवळ करमणुकीचें एक कृत्रिम साधन बनवून टाकलें आहे. उदात्ततेची ओढ आणि तज्जन्य आदर्शांना नवनवे रंग – रूप – आकार देऊन ही ओढ अधिकाधिक चैतन्यमय व तेजस्वी करण्याची दुष्कर करामत बाजूला सारून, बहुतांश आधुनिक कलाकृति यांत्रिक मनोरंजनाच्या प्रतिकृति बनूं लागल्या आहेत. ही परिस्थिति अभिजात कलेला संपूर्णपणें मारक अशी आहे.

दुसरें असें की, शाब्दिक प्रमेयांची भाषा ही कलेची भाषा नव्हे; वस्तूंना नांवें देणें, अथवा माण-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सांना नावें ठेवणें हें कलेचें कार्य नव्हे. अभिजात कलावंत उदात्ततेच्या आंतरिक ओढीने भारावलेला असतो. उदात्ततेचे दिव्य भास त्याच्या मनश्चक्षूसमोर तरंगत असतात. या अमूर्त भासांना समूर्त करणें हेंच कलेचें कार्य होय.

आमचें वैफल्य

या दृष्टिकोनांतून आधुनिक भारतीय जीवनाकडे पाहूं लागतां सर्व कांही भकास व वैफल्यपूर्ण वाटूं लागते. आम्हाला, आमच्या राजकीय नेत्यांना आदर्श उरलेले नाहीत आणि त्यामुळे उदात्ततेचे आंतरिक झरे पार आटून गेलेले आहेत. आम्ही आता कोरडे ठणठणीत झालों आहोंत. आणि विहिरींतच पाणी जेथे नाही तेथे कलाकृतींच्या पोहऱ्यांत तें पाणी कुठून येणार?

आम्हाला आधी माणूस व्हावें लागेल. नंतर असल भारतीय व्हावें लागेल. भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ व दीपस्तंभ असे जे भव्योदात्त आदर्श त्यांचें आंतरिक आकर्षण आम्हाला वाटं लागलें पाहिजे. आणि हें सर्व झाल्यानंतरहि आमच्या अंतःकरणांत आदर्शानुगामी अशी उदत्ततेची ओढ प्रस्फुरित झाली पाहिजे. हें सर्व झालें तरच महायुद्धात्मक अशा आधुनिक युगाने निर्माण केलेल्या भयानक समस्या पाहून आमचें अंतःकरण अत्यंत व्याकुल होईल. पण ही व्याकुलताच उदात्ततेची एक नवी व प्रचंड ओढ आमच्या अंतःकर्णांत निर्माण करील आणि मग हीच ओढ अस्सल भारतीय नवकलेची जननी ठरेल.

भारतीय षड् दर्शनांत आम्हा भारतीयांचे सांस्कृतिक आदर्श ग्रथित झालेले आहेत. पण आज आम्ही या सर्व दर्शनांना पूर्ण पारखे होऊन बसलों आहोंत. व्यक्ति आणि विश्व यांच्यांतील नात्याची चैतन्यमय कल्पना योगी आणि वेदांती यांच्या आदर्शामुळे जितकी साकार केली जाऊं शकते तितकी ती दुसऱ्या कोणत्याहि दर्शनाने केली जाऊं शकत नाही; याची जाणीव हळु हळू जीवननिष्ठ व मानवतानिष्ठ पाश्चात्यांना होऊं लागली आहे. हीं भारतीय दर्शनें पाश्चात्य तत्वज्ञानावरच नव्हे तर पाश्चात्य कलेवरदेखील प्रभाव पाडूं लागलीं आहेत. आणि आम्ही मात्र, राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतरदेखील सुवुद्ध पाश्चात्यांनी अर्थशून्य व त्याज्य ठरविलेल्या वैचारिकांचीं हाडें चघळण्यांतच अद्याप धन्यता मानीत बसलों आहोंत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नागपुर प्रांतांतील एक अज्ञात कवी

लेखक – सदाशिवराव कांकडे, वरोडा

नामदेव, एकनाथ किंवा तुकाराम यांचे प्रमाणेंच वेदांत विषयावर पद्यात्मक ग्रंथ लिहिणारा एक कवि या प्रांतांत इंग्रजी राज्य सुरूं होण्यापूर्वी होऊन गेला, ही गोष्ट पुष्कळांस माहीत नसेल, म्हणून आम्ही त्या कवीची उपलब्ध असलेली माहिती या लेखांत देत आहों.

आजपर्यंत अज्ञात असलेल्या या कवीचें नांव सखाराम कवि असें आहे. या कवीनें आपली गुरुपरंपरा आपल्या 'रामगीता–टीका' या ग्रंथांत दिली आहे, ती येणें प्रमाणें :–

'जे आदिनाथा पासोन । मच्छेंद्रनाथीं विवले ज्ञान ।
तेणें गोरक्षनाथासि पूर्ण । उपदेशिले जे ॥ १९३९ ॥
'तेणें गैनीनाथाप्रती । अर्पिली बोध – संपत्ति ।
तेचि निवृत्तिनाथाचे हातीं । दिधली तेणें ॥ १९४० ॥
'तेचि तयें निवृत्तिराजें । ज्ञानेश्वरा बोधिलें बो जे ।
तेचि श्रद्धेचिये व्याजें । प्राप्त सत्यामळनाथासी ॥१९४१॥
'तेथोनी परंपरेच्या ज्ञाना । पडली द्विशतसंवत्सर खंडना ।
तया जीर्णोद्धारालागीं जाणा । झाला गैवी अवतार
॥ १९४२ ॥
'तया गैवीनाथें प्रगटोन । गुप्तनाथा निवेदिली खुण ।
तेणें उद्बोधनाथा लागोन । निजबोधिलें ॥ १९४३ ॥
'उद्बोधें केसरीनाथासि । बोधिलें जे निजमानसीं ।
तेणें बाळनाथ तपोराशी । परिपूर्ण केला ॥ १९४४ ॥
'तेणें लाडुनाथा – करीं । दिधली बोधाची सिदोरी ।
ते श्रीकाशीनाथ– हृदयपात्रीं । बोगरिली तेणें ॥१९४५॥
'ऐसें मनीं जाणोनी चांग । पातला सखानाथ[1] भणंग ।
तया कांही लाधला विभाग । स्वपात्रींचा स्वामीचे
॥ १९४६ ॥

हीच गुरुपरंपरा कवीनें आपल्या 'विवेकसार' नांवाचे ग्रंथांत खाली दिल्याप्रमाणें दिली आहे :–

'श्री आदिनाथ – ब्रम्हगिरी । हृदयीं निघाली बोधझरी ।
ते मच्छेंद्रनाथ – हृदय भरी । कुशावर्त ॥ ७०४ ॥
'तेथोनी गुप्तप्रकट । ठायीं ठायीं महिमा घनवट ।
क्षेत्रप्रवाह भरोनी घाट । निर्दुष्ट गौतमी करी जेवीं
॥ ७०५ ॥
'तेवीं गोरक्ष गैनी निवृत्ति । ज्ञानेश्वर विश्वमूर्ति ।
हे मूळक्षेत्र प्रवृत्ति । बोध – गोदावरीची ॥ ७०६ ॥
'सत्यामळ गैवी गुप्तनाथ । उद्बोधकेसरि बाळनाथ ।
देखोनि जग कलिकालग्रस्त । अवतरले जे ॥ ७०७ ॥
'लाडुनाथ श्रीकाशीनाथ । एवं परंपराविस्तार स्थित ।
येथें आद्यंतीं अनुस्युत । मिरवे बोध एकचि ॥ ७०८ ॥
'श्रीगुरु काशीनाथवरें । सखाराम– हृदयीं स्फुरे ।
तेणें परिपूर्ण स्वकरें । लिहिला ग्रंथ ॥ ७२० ॥
'इति श्रीविवेकसारग्रंथ । तात्पर्य वेदांत मथितार्थ ।
षोडश प्रकरणें समाप्त । ग्रंथ पूर्ण ॥ ७२१ ॥

या कवीचे दोनच ग्रंथ हल्लीं उपलब्ध आहेत. त्यापैकीं 'रामगीता – टीका' या ग्रंथाचा काल कवीनें खाली दिल्याप्रमाणें दिला आहे :–

'शके सतराशें एकेचाळीस । प्रमाथीनाम संवत्सर
आश्वीनमास । शुद्ध विजया दशमी दिवस । ग्रंथ
संपूर्ण झालासे ॥ १९५६ ॥

शके १७४१ म्हणजे इ. स. १८१९ मध्यें १९५६ ओव्यांचा 'रामगीता – टीका' हा ग्रंथ कवीनें लिहून पूर्ण केला. पण तो आपण कोणते गावीं लिहिला आणि

१ नाथपंथी झाल्यांनंतर सखारामाचाच सखानाथ झाला. पुढें दिलेल्या परंपेरंत सखाराम असेंच नांव दिलें आहे त्या वरून ही गोष्ट स्पष्ट होते.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपण कोणत्या गांवचे राहणारे आहोंत, हें कवीनें सांगितलें नाही. तथापि त्या काळांतील दळणवळणाच्या अडचणी लक्ष्यांत घेतां असें दिसून येतें कीं केवळ सातवर्षांचे अवधींत तो ग्रंथ शंभर सवाशें मैलांचे पलीकडे उपलब्ध होणें शक्य नसलें पाहिजे. अर्थात् ग्रंथरचनेनंतर बरोबर सात वर्षांनीं 'रामगीता – टीका' या ग्रंथाची एक प्रत बरोडा येथें लिहून तयार करण्यांत आली यावरून तो ग्रंथ खास बरोडा येथेंच किंवा बरोडयापासून शंभर सवाशें मैलाचे आंत असलेल्या एखादे गांवीं तयार करण्यांत आला असावा. आणि जर या कवीला राजाश्रय मिळाला असेल तर अर्थातच तो कवि नागपुरकर भोसले किंवा चंद्रपुरकर गोंडराजे यांचे आश्रयास असला पाहिजे. कारण ही दोनहि राजधानीचीं शहरें बरोडयापासून शंभर मैलांचे आंतच आहेत. याशिवाय या कवीनें 'विवेकसार' नांवाचा जो ग्रंथ लिहिला आहे, त्या ग्रंथाचें दुसरें नांव 'मननग्रंथ–टीका' असें आहे. त्याचें कारण असें आहे कीं, वासुदेवेंद्रयतीनें 'विचारसार' नांवाचा ग्रंथ संस्कृतांत लिहून नंतर आपले शिष्याकडून त्याचें मराठींत व तेलगु भाषेंत रूपांतर करविलें. त्या रूपांतराचें नांव 'मननग्रंथ' असें आहे. त्या मननग्रंथाचें विवरण प्रस्तुत सखाराम कवीनें 'मननग्रंथ टीका' उर्फ 'विवेकसार' या ग्रंथांत केलें आहे. त्या वरून मराठी व तेलगू या दोन भाषा जेथें जवळ जवळ आल्या आहेत अशा प्रदेशांत सखाराम कवीचें वास्तव्य असावें असें दिसून येतें.

सखाराम कवीचे वरील दोन्ही ग्रंथ अध्यात्मपर आहेत. आपले परात्पर गुरु ज्ञानेश्वर उर्फ ज्ञाननाथ. यांनीं 'कृष्णगीता–टीका' म्हणजे ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिताना ज्याप्रमाणें ग्रंथारंभीं मंगलाचरणार्थ गणेशस्तवन केलें आहे, त्याच प्रमाणें गणेशस्तवन करून कवीनें 'रामगीता–टीका' या ग्रंथाचा आरंभ केला आहे, हें खालील ओव्यावरून दिसून येईल:–

'ॐ नमः सच्चिदानंदा। जगदादि मूळकंदा।
स्वसंवेद्य स्वतः सिद्धा। स्वप्रकाशा ॥१॥

'प्राणिगण करोनि एक। आपण ईश नामधारक।
गणेशरूपें जीवलोक। तारिसी शिक्षानुग्रहें ॥४॥

'जे जाणोनिया तूंतें। मंगलाचरणीं प्रार्थिते।
तया देशी निरुतें। सुमंगल फल ॥६॥

'ऐसा तुझा चिद्विलास। दाविसी अद्वैतीं द्वैतास
परि दोन्ही मिळोनी समरस। तूंचि एक ॥७॥

'बिंदु परब्रम्ह निर्गुणी। अर्धमात्रा स्फुरण ध्वनी।
तेचि मस्तकीं शोभायमानी। शुंडा विलसे ॥८॥
लेख आणि अलेख। तेचि कर्णताल सविशेष।
कला ज्योति प्रकाशक। नेत्रयुग्म ॥ ९ ॥
नादबिंदु सुक्ष्मपणें। गंडस्थलें शोभायमाने।
एवं आदि संपूर्णे। शिरोभाग ॥ १० ॥

परंतु 'विवेकसार' ग्रंथांत कोणतेहि देवतेला वंदन केलें नसून नाथसांप्रदायाचा आदिगुरु श्री 'आदिनाथ' यांचें स्मरण आणि स्तवन करूनच ग्रंथारंभ केला आहे :–

'ॐ नमो श्रीगुरु आदिनाथा। भवजलधितारक अनाथा।
निजजनानंददाता। त्रिभुवनीं समर्था तूंचि एक ॥ १ ॥
'गणेश शारदा कुलदैवत। माझे तूंचि संतत।
तुजविण दुजें न दिसे सत्य। आदिमध्याना पाहाता ॥ २ ॥
'तुझा अनुग्रहचि मंगलमूर्ति। सकल मंगलें करी त्रिजगती।
स्वानुभव-मोदकें तृप्ती। मुमुक्षु पावती तव कृपें ॥ ३ ॥
'अज्ञानतम अविद्यारजनी। माजी विघ्नें उद्भवती अनुदिनी।
ते तव कृपा–प्रभातीं ज्ञान तरणी। किरणीं अविघ्न होताती ॥ ४ ॥
'आतां असो हा विस्तार। बोली न करवी फार।
कां जे तुझे स्तवनाचा पार। वेदादिकां न वर्णवे ॥ १८ ॥

सखाराम कविकृत दोनच ग्रंथ आमचे पाहण्यांत आले आहेत. त्यापैकीं 'रामगीता–टीका' हा ग्रंथ शके १७४१ त पूर्ण करण्यांत आला असें वर सांगितलेंच आहे. दुसरा ग्रंथ 'विवेक–सार' या नांवाचा आहे. त्याचा लेखन काल कवीनें दिलेला नसल्यामुळें तो कोणते वर्षी लिहिला गेला हें सांगता येत नाही. तथापि त्याची शके १७४८ मध्यें लिहिलेली एक प्रत आमचे पाशीं आहे, यावरून तो 'विवेकसार' ग्रंथ शके १७४८ चे पूर्वी केव्हांतरी रचण्यांत आला असला पाहिजे हें स्पष्ट आहे.

सखाराम कविकृत वरील दोन्ही ग्रंथाच्या नकला शके १७४८ मध्यें आमचे पणजे श्री. नानाजी काकडे यांनीं त्या काळीं लेखकाचा धंदा करणारा विना कानस्कार सोनार याचेकडून बरोडा येथें तयार

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करवून घेतल्या असें दिसतें. कारण 'रामगीता–टीका' या ग्रंथाची प्रत लिहिणें झाल्यानंतर असें म्हटलें आहे कीः–

'शके १७४८ व्यय नाम संवत्सरे भाद्रपद मासे पंचम्याम् कृष्णपक्षे संपूर्णमस्तु। हस्ताक्षर विना कानस्कार। हा ग्रंथ नानाजी काकडे यांचा होय.'

त्याच प्रमाणें 'विवेकसार' ग्रंथाचे प्रतींत शेवटीं म्हटलें आहे कीं :–

(शके १७४८ वर्षे व्ययनाम संवत्सरे श्रावण शुक्लतृतीया रवौ दिने अयं ग्रंथः समाप्तः ।

हस्ताक्षर विना सोनार। उपनाम कानस्कार। वरूडग्राम नगर। तेथें वास्तव्य करितसे ।। ग्रंथसंपूर्णमस्तु। हा ग्रंथ नानाजी काकडे वरुडकार यांचा होय। एकंदर ओवी सुमार २६१८.

नानाजी काकडे यांचे वंशज हल्लीहि वरोडा येथेच राहत आहेत. ह्या पैकीच प्रस्तुत लेखक हा एक आहे.

सखाराम कवीची उपलब्ध असलेली माहिती वर दिली आहे. जवळ जवळ सवाशें वर्षापूर्वी होऊन गेलेल्या या कवीची ज्यास्त माहिती शोध केला असतां मिळणें शक्य आहे, म्हणून संशोधकांनीं ती माहिती मिळवून प्रसिद्ध करावी अशी प्रार्थना करून हा लेख संपवितो.

———

विदर्भ साहित्य संघ, प्रकाशन नागपूर

[मध्यप्रदेश सरकारचे मुख्य मंत्री माननीय पंडित रविशंकर शुक्ल यांनी पुरस्कृत केलेलें आणि मराठी भाषा शिकूं इच्छिणाऱ्या हिंदी भाषीयांसाठी अत्यंत उपयुक्त असलेलें पुस्तक]

हिंदी–मराठी भाषा प्रवेशिका

लेखिकाः मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी. किंमतः सव्वा रुपया

एकमेव विक्रेतेः कर्मवीर बुकडेपो, महाल, नागपूर २

अनुक्रमणिका

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. भालचंद्र राजाराम लोवलेकर

★ ★ ★ लेखक :—प्रभाकर माचवे ★ ★ ★

भरे आकाश मेघांनी, झरे पाणी नवा पाला
उजाळूनी नवा हिरवा धरा हा पांघरी शेला

१९३४ सालीं ऐकलेल्या एका गज्जलांतील वरील ओळी मला काल एकदम आठवल्या व कै० लोवलेकरांची मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली. लोवलेकरांच्या कित्येक कविता मला आठवतात. खरें काव्य तेंच कीं, जें रसिकांच्या मनांत सदैव राहतें. लोवलेकरांच्या कविता त्यांच्या सर्वच स्नेह्यांना मुखोद्गत आहेत. परवां मूल येथें गेलों असतांना लोवलेकरांचे जिवलग स्नेही श्री० त्रिंबक सदाशिव काकडे यांची गांठ पडली. 'लोवलेकरांची कविता' या संग्रहांत नसलेल्या अनेक कविता त्यांना तोंडपाठ आहेत. शांताबाई शेळके कांहीं महिन्यांपूर्वी नागपुरास आल्या होत्या. त्यांना लोवलेकरांची 'मोहनराणी' ही कविता पाठ येत होती. लोवलेकरांचें काव्यच असें आहे कीं तें ऐकल्यावर अगर वाचल्यावर कायमचें स्मरणांत राहावें. त्यांचें व्यक्तिमत्वही असेंच होतें कीं, त्यांची आठवण नेहेमींच होत राहील. लोवलेकर व त्यांची कविता हा त्यांच्या स्नेह्यांचा असा कांहीं विषय आहे कीं, त्या संबंधीं बोलतांना वेळेचें भानच राहूं नये. खामगांवला कांहीं दिवसांपूर्वी मी गेलो होतो तेव्हां इंगळे नांवाचे आमचे जुने स्नेही भेटले. लोवलेकरांच्या आठवणी निघाल्या. कितीतरी वेळ आम्हीं बोलत होतो. लोवलेकरांचें व्यक्तित्व माझ्या मनाच्या लेण्यांत नेहमींकरतांच कोरलेलें आहे.

१९३१ ते १९३५ या काळांतील तें इंदूर. मी ख्रिश्चन कॉलेजमध्यें होतो. लोवलेकर होळकर कॉलेजमध्यें होते. इंटरमध्यें मराठींत सर्वांत अधिक गुण त्यांनी मिळविले होते. पुढें ते बी. ए. झाले. आमच्या बैठकींत लोवलेकरांचे जानी—दोस्त नाना बेंद्रे (सुप्रसिद्ध चित्रकार एन्. एस्. बेंद्रे) नेहमींच असावयाचे. या दोघां 'यायावरां'नी (Tramps) केवळ १८ रुपयांत फकिरासारखे चणे फाकत फाकत, जयपूर आग्रा, शिक्री, दिल्लीची यात्रा केली होती. जीवनाचा सर्वंकष अनुभव घेण्याची कलावंताची कलंदर वृत्ति लोवलेकरांमध्यें होती. अशी वृत्ति आपल्याकडील फारच थोड्या साहित्यकारांमध्यें आढळते.

जीवनाचा आनंद लुटतांना लोवलेकरांची वृत्ति व्यावहारिक नव्हती. त्यांच्या सृजनशील प्रतिभेनें जीवनांतील यशापयशाचा आर्थिक स्वास्थ्याचा विचार केला नाही! ते आजीव कवि राहिले. बेफाम उत्कटतेनें जीवनांतील नाना रसांचा मनमुराद आनंद लुटतांना त्यांनी आमच्याकडील अनेक 'तथाकथित' कलावाद्यांप्रमाणें विचकत, घाबरत भीतभीत गोष्टी केल्या नाहीत. एकदां कॉलेजांतील विद्यार्थिनींचा ग्रूप–फोटो त्यांनी चोरला होता व त्यांतील आपल्या प्रेयसीला त्यांनी स्वतःच मागणी घातली होती. त्यांच्या बेडर वर्तनाच्या अनेक गोष्टी सांगतां येतील. त्यांची उत्कट वृत्ति इतरांना समजूं शकली नाही. ते कवि म्हणूनच जगले. अव्वल दर्जाचे साहित्य रसिक, व्यासंगी अभ्यासक, ललितकलांचे दर्दी, बहुश्रुत व मधुकर वृत्तीनें ज्ञानग्रहण करणारे विद्यार्थी असें साधें वर्णन लोवलेकरांचें करतां येईल. पण त्यांचें खाजगी जीवन वर्णन करावयाचें म्हटल्यास पानांची संख्या पुरणार नाही. अनेक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संस्मरणें लिहिण्यासारखीं आहेत. त्यांचें एक स्वभाव-चित्र मी 'अभिरुचि'च्या ऑगस्ट १९४५च्या अंकांत लिहिलेलें आहे. 'मंदार' 'मालवसाहित्य' इत्यादि मासिकांतून मी लोवलेकरांसंबंधी बरेंच लिहिलें आहे. त्यांच्या कविता प्रसिद्ध करण्यांत मी बराच भाग घेतला आहे. असें असूनसुद्धां लोवलेकर स्मारक मंडळानें मी लिहिलेलें लोवलेकरांचें जीवनचित्र छापलें नाही. मध्यभारतांतील मराठी लेखक महाराष्ट्रांतील लेखकांकडे, न्यूनगंडानें प्रेरित होऊन नेतृत्व वहाल करीत असतात. खरें पाहिलें असतां लोवलेकरांवर रंगून लिहिणारा लेखक माळव्यांतीलच राहूं शकतो. लोवलेकरांचें संपूर्ण जीवन माळव्यांतच व्यतीत झालें. त्यांच्या जीवनाच्या अनेक छटा त्यांच्या मालवस्थ स्नेह्यांनी पाहिल्या. त्यांचे अंतरंग जाणून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु शेवटीं लोवलेकरांवर लिहिण्यासाठीं माळव्या बाहेरील 'तथा-कथित' श्रेष्ठ लेखकाला विनंति करण्यांत आली. मालवस्थ साहित्यकारांचा हा पराकोटीचा न्यूनगंड त्यांच्या प्रगतीच्या आड नेहमीच येणार आहे, असो.

लोवलेकरांना माळवा अत्यंत प्रिय होता. त्यांच्या काव्यांत मालवभूमीचा सुगंध दरवळला आहे. मालव देशांतील निसर्गसौंदर्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झालेला आहे. 'चोरलघाट, पाऊलवाट' 'अखेरीस हुरळत्या जिवाचे दुखी सुख इंदोर' 'माळवीण भिल्लीण भोरी' 'माळव्यांत वैकुंठ आणूं ये अमूर्त स्वप्नें करुं उघडी !' इत्यादि त्यांच्या अनेक ओळी मला या क्षणीं आठवत आहेत. कै. तांब्यांच्या नंतर मालवभूमीचें चित्रण जर कोणी केलें असेल तर तें लोवलेकरांनीच. त्यांच्या शब्दचित्रांतून जानपद जीवनाचें उत्कृष्ट चित्रण त्यांनी केलेलें आपणांस आढळेल. त्यांची वृत्ति अस्सल कलावंताची असल्यामुळें त्यांनी प्रसिद्धीची पर्वा केली नाही. मी त्यांची तीन इंग्रजी पत्रें एका साहित्यिक मासिकाकडे प्रसिद्धीसाठीं पाठविलीं होतीं. त्याची पोंचही आली नाही. लोवलेकर स्वतः प्रसिद्धि पराङ्मुख होते पण आतां त्यांच्या निधनानंतर त्यांचें समग्र–साहित्य प्रसिद्ध करणें जरूर आहे. मध्यभारत, विदर्भ व मराठवाडा या मराठीभाषी प्रांतांतील अनेक गुणवान् साहित्यकारांची स्थिति लोवलेकरांसारखीच झालेली आहे. कै. बुवा उपाध्ये यांचें समग्र काव्य, डॉ. केतकरांचें अप्रसिद्ध संशोधन असे अनेक दाखले मला देतां येतील. अनेक प्रतिभावंतांचा अनादर, अनुल्लेख चाललेला आहे. लोवलेकरांसारख्या अनेक हेमकणांना आम्ही मातींत लोटून देत आहोत आणि खोटया सोन्याला भाव चढवीत आहोत. महाराष्ट्रांतील साहित्यसंस्था काय करीत आहेत याचा मला अजून बोध होत नाही. कै. लोवलेकरांच्या सारख्या कवींना हें कळलें होतें कीं, आजच्या जगांत गुणी माणसांचा लौकिक वाढत नाही व म्हणूनच ते उद्गारतात,

" येथे स्थिरेना चारुता बांधू
कशाला गेह मी ?
हुडकीत चारु गभीरता हिंडेन
भूवर नेहमीं "

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

आषाढीच्या काळ्या मेघा–

(जाति – पादाकुलक)

आषाढीच्या काळ्या मेघा !
नील अंबरा सर्व व्यापुनी ।
शशि तारांची रम्य नभःश्री
ठेविलीस रे कोठे लपवुनि ? ॥ १ ॥

आणि तुझ्या त्या कडाकडांना
दिसे रुप्याची किनार सुंदर ।
कोण लावितो ही जरतारी
चंदेरी रजताची झालर ? ॥ २ ॥

धुंद दश दिशा आगमनें तव
धुंद धरित्री हो जलपानें ।
गंध दरवळे वातावरणीं
मस्त नाचती वनें – उपवनें ॥ ३ ॥

पहिल्या – वहिल्या तव नवतीच्या
रूपां बघुनी कालिदास कवि – ।
रचिता झाला काव्य अभिनवा –
मेघदूत,– ही तुझी थोरवी ॥ ४ ॥

जसा वरुनि तूं दिसशी काळा
अंतरंग तव तसेंच का रे ? ।
छे ! ... छे ! ... तेथे तर जळजळतें
लख्ख विजेचें तेज सरसरें ॥ ५ ॥

परंतु अमुच्या जगांत मेघा !
जरा पहा, ये दुनियादारी ।
'उप्परकीं तों खूप बनी है
अन्दरकी है बाते न्यारी" ॥ ६ ॥

शुद्धत्वाची झूल तनूवर –
शुभ्र वस्त्र लेवून सदोदित – ।
कृष्ण – कृत्य करण्यांत रंगती
काळ्या बाजारांत प्रतिष्ठित ॥ ७ ॥

कारण वरच्या काळ्या रंगा
तिरस्कारिते मानव–जाती ।
आणि बेगडी न खरा नखरा
पाहुनिया जन सर्व मोहती ॥ ८ ॥

त्यापरि मेघा कृष्ण वर्ण तव
लाखपटीनें बरा वाटतो ।
देव कृपेचा झरा निरंतर
दयार्द्रतेनें त्यांतुनि झरतो ॥ ९ ॥

रत्नाकर तुज दे जल – रत्नें
येशी उधळित त्यांना भूवर ।
"नानारत्ना वसुंधरा" – ही
सार्थ करी तव कृती निरंतर ॥ १० ॥

म्हणून आषाढींच्या मेघा
मोत्याचा पाऊस पाडणें ।
कणसांकणसांतून निघूं दे ।
ज्वारीचे ते टपोर दाणे ॥ ११ ॥

परी नको रे शिंपल्यांतलें –
मोती निर्मायाची आस ।
श्रीमंतांचे विलास होतिल
पडेल गरिबांना उपवास ॥ १२ ॥

कणसांतिल मोत्यांचें पाणी
शेतकऱ्यांच्या मुखीं विलसता ।
धन्य धन्य वाटेल तुला मग –
तव जीवनिची हो सार्थकता ॥ १३ ॥

–प्रा. मा. ल. व्यवहारे एम्. ए.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निळी सावली

धुंद जाहल्या दिशा, बघ सखी ! धूळ नभा भिडली
धरणीवर तापल्या मृगाची निळी सावली पडली.

दूरदुरुनी भिजून आला शुष्क कालचा वारा
गोड शिरशिरी उठवित वाहे चाटित उघडया शरिरा.

करून किलबिल सोडुन घरटें उडें नभीं पाखरूं
पिवून वारा उडवुन शेपुट हुंदडतें वासरूं.

वाट पाहुनी थकले सारे आज मनीं हर्षले
मेघ पाहुनी नयनीं त्यांच्या पाणी डबडबलें.

तयार माझी जमिन संपली कालच नांगरणी
आज पडूं दे पाउस, धरतो उद्यांच मी पेरणी.

घाम गाळला, मोती त्यांचे खचित उद्यां होतील
दिन दैन्याचे सरतिल मनिंचे बेत फळा येतील.

म्हणेन ना मग पुन्हा नेस ती ठिगळ लावली साडी
फेकुन दे ती जुनी पुराणी जीर्ण शीर्ण गोधडी.

तुझ्या कुशीतिल सोन्या माझा सुखांत वाढेल
बाग बगीचे अपुले तोहि हसून फुलवील.

सोन्याचा दिन आज सखे ग ! सुखांत ह्या रंगू
तृप्त धरतिचे श्वास सुखाचे आपणहि हुंगू.

-- गुणाकर देशपांडे

उघडी लाज

पाय घसरुनी रस्त्यावरती
पडली लाज उताणी
कोसळलें वळवाचें पाणी
गगनांतुन संतानी

रेघ ओढते चंचल बिजली
जलदाच्या फलकावर –
सुकलें जीवन चिंब व्हायचें
हळूच उललें अक्षर

अन् लज्जेच्या हृदयांमधली
हंसली पिवळी माती
कुठेतरी खोलांत डवरलीं
म्लान तृणाचीं पातीं !

डोक्यावरती जलद जांभळे
माती पायाखालीं
कणाकणाची जीवन आशा
फुले तृणा भवताली

वसन फाटकें विटली मुद्रा
ठिसूळ उघडी काया
नयनपाखरें शोधुं लागलीं
जरा कुठेशी छाया

रस्त्यावरुनी धावत सुटलें
गढूळलेलें पाणी
उघडी लज्जा तिथेंच अजुनी
होती पडुनि उताणी

पुरे प्रभू रे विटंबना ही
उघडया रस्त्यावरती
कुठेतरी गर्भांत तिच्या दे
फुलू उद्याची क्रांति !

-- बाबा मोहोड

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समालोचन

साहित्य : निर्मिति व समीक्षा

(लेखक– दि. के. वेडेकर. प्रकाशक– चित्रशाळा प्रकाशन, पुणें २. किंमत तीन रुपये)

आजच्या मराठी वाङ्मयामधील कथा, काव्य, नाट्य, कांही अंशीं कादंबरी – या विविध वाङ्मय-प्रकारक्षेत्रांत नवनवे प्रवाह उदयास आलेले आहेत; आणि नवकथा, नवकाव्य, नवनाट्य इत्यादि संज्ञांचा सध्या होत असलेला वापर हा या नवप्रवाहांच्या प्रभावाचा स्पष्ट द्योतक आहे. कथा, काव्य, नाट्य या सृजनशील वाङ्मयप्रकारांप्रमाणे वाङ्मयसमीक्षा हा सुद्धा, सर्वस्वी सृजनशील नसला तरी तितकाच महत्वाचा वाङ्मयप्रकार आहे आणि विशेष गौरवाची आणि समाधानाची गोष्ट ही की या वाङ्मयसमीक्षेच्या क्षेत्रांत सुद्धा आजच्या मराठीमध्यें नव्या प्रगमनशील विचारांचा उदय होऊं लागलेला आहे. वाङ्मयसमीक्षेच्या क्षेत्रांत नवविचारांच्या होऊं लागलेल्या प्रवर्तनाचें एक चिन्ह म्हणून या वर्षाच्या प्रारंभींच प्रसिद्ध झालेलें दि. के. वेडेकरांचें 'साहित्य – निर्मिति व समीक्षा' हें पुस्तक विशेषेकरून उल्लेखनीय आणि अभ्यसनीय आहे.

वेडेकरांच्या पुस्तकाचें – तात्विक आणि प्रात्यक्षिक असें दुहेरी स्वरूप आहे. म्हणजे असें की पुस्तकांतल्या अर्ध्याअधिक लेखांतून त्यांनी, वाङ्मयकलासमीक्षेसंबंधीचीं त्यांना मान्य असलेलीं जीं मूल्यें आहेत त्यांचें, त्यासंबंधीच्या इतर मूल्यांचा यथोचित परामर्ष घेऊन समर्थन केलेलें आहे आणि उरलेल्या लेखांतून मुख्यत: नवकाव्य आणि नवकथा या वाङ्मयप्रकारांची समीक्षा केलेली आहे. अर्थात्च या पुस्तकाचें जें अनन्य महत्व आहे तें मुख्यत: त्यांत प्रतिपादिलेल्या वाङ्मयसमीक्षाविषयक तत्वविशेषांचें आहे आणि त्यामुळे त्या तत्वविशेषांचा परिचय व परामर्ष हाच या पुस्तकाच्या परीक्षणाचा मुख्य भाग राहणें अपरिहार्य आहे.

कला म्हणजे कलावंताच्या व्यक्तित्वाचा आविष्कार, याच सिद्धान्ताचा वेडेकरांनी आपल्या विवेचनांतून प्रपंच मांडलेला आहे; पण व्यक्तिवाद्यांचा या सिद्धान्ताकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन आहे त्याहून वेडेकरांचें विवेचन मात्र सर्वस्वीं भिन्न आहे. व्यक्तिमत्व आणि वास्तव यांच्या परस्परसंबंधामधूनच कला जन्मास येते, असें, आत्यंतिक व्यक्तिवादी आणि आत्यंतिक वस्तुवादी यांच्याप्रमाणे वेडेकरांचेंहि म्हणणें आहे; परंतु त्या परस्परसंबंधांचे या तिघांनी लावलेले अर्थ मात्र वेगवेगळे आहेत. कलानिर्मितींत व्यक्तिमन तेवढें क्रियाशील असतें, पण वास्तव जड आणि निष्क्रीय असतें, असें व्यक्तिवाद्यांचें म्हणणें. याउलट, वास्तवच फक्त क्रियाशील आणि परिणामकारक असतें, कवीचें मन त्या वास्तवाचें नुसतें प्रतिबिंब उमटविण्याचें कार्य करतें, असें वस्तुवाद्यांचें म्हणणें. या दोन्ही अतिरेकी आणि एकांतिक मतांच्या समन्वयांत वेडेकरांनी कलानिर्मितीच्या प्रक्रियेचें सत्य स्वरूप शोधलेलें आहे. कलानिर्मितींत एकीकडे कलावंताच्या व्यक्तित्वाला व दुसरीकडे वास्तवाला त्यांनी सृजन व्यापाराचें कारण व प्रेरणा मानलेलें आहे. कलानिर्मितीमध्यें व्यक्तित्व आणि वास्तव यांचें द्वंद्व असतें असें त्यांचें म्हणणें आहे. हें द्वंद्व कसें कार्यप्रवण होतें हें स्पष्ट करतांना त्यांनी लिहिलें आहे: मन हें मुळांत आत्मनिष्ठ असूनहि वास्तवाशीं तादात्म्य पावून त्याचा 'आकार' घेऊं पाहतें, उलट, वास्तव हें आपली मूळ बाह्यार्थाची स्थिति सोडून कविमनाच्या 'आकारा'चा आशय बनूं पाहतें. या परस्पर प्रक्रियेंतूनच कलाकृतीचा जन्म होतो.' बालकवीच्या फुलराणी' या कवितेला ही प्रक्रिया लावून दाखवितांना त्यांनी लिहिलें आहे, बालकवीचें मन हें नुसतेंच अंतर्मुख व चिंतनशील न राहतां बाह्यार्थ अशा एका सुंदर फुलाशीं एकरूप होतें, आणि त्या फुलाच्या रंगरूपाशीं, दंवबिंदूशी तादात्म्य पावतें; उलट तें फूलहि नुसतें गवतांतलें फूल न राहतां कवीच्या मनांत अनुप्रवेश करतें व त्या मनांतील आनंदाशीं व सौंदर्यासक्तीशीं एकरूप होऊन जातें. मग 'फुलराणी' ही कविता जन्म घेते. या कवितेंत कवीचें मन असतें व फूलहि असतें; पण परस्पर संबंधाच्या तादात्म्याच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रक्रियेमुळे एक उलटापालटहि झालेली असते. ती अशीः मनाने आपला मूळचा अव्यक्त व परोक्ष राहण्याचा स्वभाव सोडलेला असतो व तें प्रकट व मूर्त झालेलें असतें; आणि फुलाने आपला मूळचा व्यक्त व मूर्त स्वभाव टाकून काव्याचा म्हणजे कलात्मक कल्पनेचा, वेष धारण केलेला असतो.' मूर्त वास्तव हें मूर्त अशा कलात्मक कल्पनेचें स्वरूप धारण करतें, हें वेडेकरांचें म्हणणें शिल्पकलेच्या उदाहरणाने अधिक स्पष्ट होऊं शकतें; कारण दगड वगैरे सारखी मूर्त, जड वस्तु शिल्पकाराच्या मनांतील कल्पनेला साकार करून नव्याच रूपांत अवतरते.

वर 'कलात्मक कल्पना' या ज्या संज्ञेचा उल्लेख केलेला आहे तिलाच वेडेकरांनी कलाकृतीचें व्यवच्छेदक लक्षण मानलेलें आहे; म्हणजे नवनिर्मिति हा त्यांच्या मतें कलात्मकतेचा गाभा आहे. या नवनिर्मितीच्या अंगावर सर्व भर दिलेला असल्यामुळें, आस्वाद, प्रयोजन व परिणाम या कलाविषयक चर्चेत नेहमी आढळणाऱ्या बाबींना त्यांनी अगदीच गौण स्थान दिलेलें आहे. वेडेकरांच्या कलादृष्टीचें नवेंपण यांतच आहे. वाङ्मयामध्ये मनोविकारांना जें वेगळें अर्थरूप प्राप्त होतें, त्या अर्थरूपांची निर्मिति आणि विकल्पन यांचा शोध घेणें हें वाङ्मयसमीक्षा-शास्त्राचें खरें कार्य आहे, हें दाखवून देण्यांतच वेडेकरांच्या कामगिरीची मौलिकता सामावलेली आहे. विकल्पन म्हणजे रचणें म्हणजेच नवनिर्मिति ही कले-प्रमाणे ज्ञानांतहि असते. परिस्थितीला वांछित आकार देणें, हा कलेप्रमाणे ज्ञानाचाहि हेतु आहे; पण ज्ञाना-त्मक कल्पना ही व्यक्तिनिरपेक्ष असते तर कलात्मक कल्पना ही व्यक्तिनिरपेक्ष न राहतां आत्मप्रत्ययजन्य असते.

समीक्षाशास्त्रहि एक स्वतंत्र शास्त्र आहे; म्हणजे कलेचें मूल्यमापन कलेच्याच मूल्यांनी होणें आवश्यक आहे, असें निक्षून सांगत असतांनाहि वेडे-करांनी कलेच्या मूल्यांच्या अपरिहार्य स्वरूपाच्या सामाजिकतेवरून आपली दृष्टि ढळूं दिली नाही ही खरी अभिनंदनाची बाब आहे. कलेची परीक्षा कला म्हणूनच झाली पाहिजे, पण कलावंताला प्रतीत होणारें वास्तव हें सर्वसामान्यांना प्रतीत होणाऱ्या वास्तवाहून वेगळें आणि अलौकिक कोटींतलें असतें या भ्रामक 'अबोधवादी' विचारसरणीपासून मात्र ती समीक्षा अलिप्त असली पाहिजे. कलेचीं अंगें दोन १ कला-वंताचें व्यक्तित्व आणि २ वास्तव. हीं दोन्ही यथार्थतः सामाजिकच आहेत. तेव्हा तात्पर्यार्थ काय की कला ही स्वतंत्र असून स्वभावतःच सामाजिक आहे. नव्हे, तिला असामाजिक मानवाची प्रवृत्ति ही वाङ्मयविषयक विकृत आणि विनाशकारी विचारसरणींना जन्म देणारी आहे हें वेडेकरांनी या पुस्तकांत तर्कशुद्ध विवेचन करून सिद्ध केलें. या पुस्तकाच्या रूपाने मराठींतील समीक्षा-शास्त्रांत मूलगामी आणि उपकारकारक विचारसरणीची भर घातल्याबद्दल श्री. वेडेकर हे निस्संशय समीक्षा-शास्त्रजिज्ञासु वाचकांच्या अनंत धन्यवादाला पात्र ठरलेले आहेत.

— अ. ना. देशपांडे.

क्षिप्रा

(लेखक : शरच्चंद्र माधव मुक्तिबोध. सुरसग्रंथ-माला, सोलापूर.)

क्षिप्रा ही मुक्तिबोधांची पहिली कादंबरी. वस्तुतः ती संपूर्ण कादंबरी नाही; संकल्पित कादंबरीचा एक भाग आहे. प्रसिद्ध झालेल्या कथाभागाच्या शेवटीं कथेचा नायक विशू हा तेरा–चौदा वर्षांचा पितृहीन झालेला मुलगा शिक्षणासाठी मावशीकडे जायला प्रवा-साला निघतो. त्याचा खरा जीवनपट अजून उकलला जायचा आहे. आतां तर कोठें प्रारंभ आहे, अशीच भावना ही कथा संपवताना वाचकाच्या मनांत राहते. तेव्हां एवढ्या भागाचें विश्लेषण–विवेचन जरा अगाऊ-पणाचेंच ठरेल. परंतु आहे एवढा भाग एका दृष्टीनें पूर्ण आहे; शिवाय, त्याचीं कांहीं वैशिष्ट्यें एवढीं उठावदार व नवीन आहेत की त्यांच्याकडे लक्ष वेधणें अवश्य आहे.

विशू हा या कथेचा नायक खरा, परंतु एका वेगळ्या अर्थानें केवळ तोच नायक नाही. विशूच्या स्वभावाचें चित्रण कौशल्यपूर्ण आहे. त्याच्या बाळमनां-तील विचार, त्याचीं दुःखें, त्याच्या मनांतील अनेक प्रकारची भीति, त्याच्या आकांक्षा व अनेक संघर्ष, त्याची सुप्त शक्ति हें सर्व नाजूकपणें व सूक्ष्मपणें रंग-वलें गेलें आहे. त्याच्या भोंवतालच्या विश्वाकडे जणूं त्याच्या डोळ्यांतून पाहिलें जातें; त्याच्या मनाच्या ताग-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डीत तें तोललें जातें. त्या विश्वाच्या छाया त्याच्या अंतर्मनावर कशा पडतात, त्यांतील प्रकाशस्थळांनी तेंच अंतर्मन कसें उजळून निघतें, याचीहि जाणीव राखली जाते. त्याचें एवढेंसें मन एकेका अनुभवानंतर खूणगांठ बांधतें, निश्चय करतें, भविष्यकाळाविषयी संकल्प करतें. 'मधुदादा आईला किती फाडफाड बोलतो' हें त्याला तीव्रतेने जाणवतें; वडिलांचा भार उचलण्यासाठी, 'देवा मला लवकर मोठा कर' या उत्कंठेने तें भरून जातें. चित्रें पाहण्याच्या कर्जफेडीसाठी दोन पैसे आणलेच पाहिजेत, असें चिंतू वझेने दटावल्यामुळें त्याच्यापुढें भयंकर समस्या उभी राहते. ती सोडवण्याच्या चिंतेने तें मन व्याकुळ झालें असतांना बापूंची नीतिनिष्ठा आणि 'शंकरजी'वरील हवाला यांची जाणीव, तापल्या सोन्यावर मुद्रा उमटावी तशी त्यावर उमटली जाते. या त्याच्या सतत विचारांतून, संघर्षांतून त्याच्या मनाची शक्ति उफाळून येते. वर्गातल्या कोणाहि मुलाने कधी धरली नाही एवढी हिंमत धरून तो चिंतू वझेच्या दंडेलीचा प्रतिकार करतो आणि तोहि दुराफेची बाजू घेऊन. तेवढ्या प्रतिकाराने त्यांच्या मनाला जणूं पंख फुटतात; तें भीतिमुक्त होतें. तो एका नव्या जाणिवेने दुराफेला म्हणूं लागतो 'मार खावा, पण लढावं झगडावं. कुणाची मुजोरी नाही चालूं देऊं.' लहान लहान प्रसंगांच्या प्रतिक्रियांतून त्याचें मन वाढतें, विकासतें. त्याच्या स्वाभाविक मर्यादांची ओळख ठेवून त्याचें चित्रण केलें जातें, परंतु त्याच्या अंतःशक्तीची जाणीव मात्र स्पष्टपणें निर्माण केली जाते. त्यांच्या जीवनाचा जेवढा भाग येथे आला आहे त्यांत एवढेंच सहजपणें होण्यासारखें आहे. व तें चांगलें कुशलपणें केलें गेलें आहे. बालमनाच्या चित्रणांत अनेक मराठी कथांमध्यें दिसणारी अस्वाभाविकता किंवा अफाटपणा येथे नाही. येथें सूक्ष्मता, साहजिकता, कोमलता व सामर्थ्य यांचा समन्वय आढळून येतो.

पण, वर सुचवल्याप्रमाणें केवळ विशूच या कथेचा नायक नाही, असें म्हणतां येईल. साधारणपणें कोणत्याहि कादंबरींतील मुख्य व इतर पात्रें यांच्या रंगदारपणांत, भरीवपणांत पुष्कळ फरक असतो; तसा येथे नाही. विशूइतकेंच त्याचा मोठा भाऊ मधू याचें मनश्चित्र उठावदार आहे. विशू व मधू हे दोन मूलरंगाइतके वेगवेगळे आहेत. विशूच्या चित्रणांत हळुवारपणा, कित्येकदां लडिवाळपणा आहे. मधूच्या चित्रणांत त्वेष आणि विषाद, वेछूटपणा आणि अगतिकता यांचा संगम आहे. त्याच्या वाढाळू मनाचे संघर्ष व आकांक्षा, त्याच्या चिंता व स्वप्नें किती वेगळीं. त्यांचा जोम वेगळा व त्वेषहि वेगळा. त्याच्या अंतर्मनाच्या विश्लेषणांत, त्याच्या काव्याच्या उमाळ्याच्या वर्णनांत, त्याची पहिलवानगिरी, त्याचें निशाचरासारखें भटकणें, पोहणें, वैतागणें, निघून जाणें यांच्या चित्रणांत मुक्तिबोधांच्या लेखणीला एक वेगळी धार येते. विशू–मधूच्या एकमेकाविषयीच्या दुवारी (ambivalent) वृत्तीचें चित्रण फार आशयपूर्ण, वास्तव व समतोल झालें आहे. प्रत्येकजण दुसऱ्याला एक कोडेंच वाटतो. त्यांना एकमेकाविषयी जात्या आपुलकी आहे, माया आहे. परंतु त्यांचे स्वभाव एवढे भिन्न, आकांक्षा एवढ्या वेगळ्या कीं त्यांना एकमेकांचें कांही समजूं शकत नाही. आईबाबांकडे पूर्ण दुर्लक्ष करणाऱ्या, स्वयंकेंद्रित मधूविषयी विशू म्हणतो, " पुस्तकांतलं वाचून दादा रडतोय् !" आणि " त्याच्या छातींतून तिरस्काराची एक विलक्षण कळ आरपार निघून गेली. " या उलट, नोकरी गेल्यावर, उपाशी पोटीं पानावरून उठलेल्या मधूची नजर विशूकडे जाते तेव्हां त्या ' चिमुरड्या नि अगदी अपरिचित मनाच्या विशूकडे पाहून त्याच्या तळपायाची आग मस्तकाला जाते. ' तरीपण या परस्परतिरस्काराच्या पोटीं खोल आपुलकीहि आहे.

विशू–मधूची बहीण सुमी ही या दोघांच्या मानाने, येथवरच्या कथाभागांत तरी, पार्श्वभूमींत लपलेली. स्वयंपाकघराच्या मंद उजेडांत, आईच्या पाठीशीं किंवा तिच्या हाताशीं काम करतांना तिचें अस्तित्व जाणवायचें. परंतु तेवढ्या ठिकाणच्या चार–दोन ओळींतहि तिचें नाजुक व्यक्तित्व, तिचें प्रेमळ मन, नीटस बांधा उठून दिसतो. ती एकदोनदांच नदीवर धुणें धुवायला निघते तेव्हां पूर्ण प्रकाशांत येते– कधीं एकटीच आणि कधीं शेजारच्या केकऱ्यांच्या कमळी बरोबर, तर कधीं मधूवर अबोलपणें प्रेम करणाऱ्या भावेच्या वहिणीबरोबर बोलत. सुमीच्या नदीवरच्या वेळाच्या वर्णनांतील नाजुक काव्यात्मता, त्यांतील मनकवडेपणा, तिच्या बरोबरीच्या मुलींच्या संवादांतील स्वाभाविकता, सहज नजरेंत भरते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या तिघांच्यावरचें निवाऱ्याचें छत्र बापू – रमाबाईच्या मायेचें – दारिद्र्याशी झगडतां झगडतां, आपलीं मूळचीं जीवनमूल्यें राखतां राखतां, जीर्ण झालेलें पण चिवट व सनातन. त्या दोघांच्या गाढ पण अबोल प्रेमाचें चित्रण जितकें उत्कट तितकेंच संयमशील आहे. बापूंना कचेरीतून परतायला उशीर झाला ती रमाबाईची संध्याकाळ या दृष्टीनें लक्षांत भरण्यासारखी आहे. एवढें एक प्रकरण व त्याचा अगदी अनपेक्षित शेवट हें देखील मुक्तिबोधांच्या घटनाचित्रणांतील व मनश्चित्रणांतील कौशल्याची साक्ष द्यावयास पुरेसें आहे.

अशा या कुटुंबाचें जीवन हेंच या कादंबरीचें केंद्र आहे. हें कुटुंब, त्याचे संबंधी लोक, त्याची सामाजिक पार्श्वभूमि यांचें चित्र स्पष्ट होत जातें, त्यांतील अंतःसंघर्ष व त्याचा बाह्यसंघर्ष ह्यांना धार चढते व शेवटी त्याचा जवळ जवळ विलय होतो. बापूंच्या मृत्यूनें त्याची एक पिढी संपून जाते आणि नव्या पिढीचे दोन दुवे दोन बाजूंना फेकले जातात. ह्या प्रवाहांतून दोन ओहळ बाहेर पडतात. त्या दोन ओहळांचे प्रवाह ह्यापुढे लेखकाला रेखाटावयाचे आहेत. हें कुटुंब लहानसें आहे; केवळ मध्यमवर्गीय व म्हणून संकुचित आहे; त्याच्या पार्श्वभूमीचें व जीवनसंघर्षाचें चित्रणहि मोठेसें व्यापक नाही; त्याचें क्षेत्र केवळ एका लहानशा गावांतल्या अरुंद गल्लींतलें आहे इत्यादि गोष्टी आजच्या विशाल सामाजिकतेच्या मागणीच्या दिवसांत पुढे केल्या जाण्यासारख्या आहेत. पण त्याहून लक्षणीय गोष्ट ही आहे कीं ह्या कथेमध्ये जें आहे तें उत्कट, प्रत्ययकारी, नेमकें व मोजकें आहे. चित्रणाचें एक वेगळेंच नावीन्यपूर्ण तंत्र येथे अवलंबिलेलें दिसतें. येथे वस्तुनिष्ठेला आत्मप्रत्ययाची धार आली आहे. त्यामुळे प्रत्येक पात्राचें चित्रण आंतून केलें गेलें आहे. त्याच्या विचारप्रवाहांत एकसंधपणा व त्याच्या भावनांत सहजता आली आहे, त्याची कृति अपरिहार्य आणि वाणी, प्रतिमासृष्टीसह, नेमकी व स्वाभाविक वठली आहे. येथील शैलींत जडपणा नाहीं किंवा विश्लेषणांत पांडित्य नाहीं. शक्य तितक्या कमी पण भावपूर्ण शद्बांत एकामागून एक घटनाचित्रें व मनश्चित्रें उभीं केलीं आहेत. एकेका प्रकरणांतील घटनेंत साधारणपणें एकेकच पात्र केंद्रस्थानी कल्पिलें गेलें आहे. त्याच्या दृष्टींतून वाचकाला पहायला लावलें आहे. परंतु हें पात्रगत निवेदनाच्या तंत्रामध्ये जसें कप्पेबजा व कृत्रिमपणें केलें जातें तसें केलेलें नाही. जितक्या सहजपणे एखाद्या चांगल्या चलच्चित्रांत प्रकाशझोत एका आकृतीवरून दुसरीवर व पुन्हा पहिलीवर किंवा आणखी एखादीवर फिरतो तितक्याच सहजपणें हें केलें आहे. ह्या तंत्रामुळे व्यक्तिचित्रणांत जितकी स्वाभाविकता तितकीच उत्कटता आली आहे.

हें सर्व आहे व यामुळे मुक्तिबोधांची ही कथा सामाजिक आशय, व्यक्तिमनाच्या संघर्षाची खोल जाणीव, नाजूक व नेमकी शैली, ह्यांनी फुललेली आहे. परंतु त्यामुळेच एक फार मोठी तक्रार उद्भवते आणि ती म्हणजे हें फार थोडें आहे याची. ह्या कथेला अजून पुष्कळ वाटचाल करावयाची आहे. आणि खरी चढण पुढेच आहे. या पहिल्या भागांतील तंत्राची आणि शैलीची पातळी टिकविणें जबाबदारीचें होणार आहे. कादंबरीच्या लेखनांत अनेक ठिकाणी निष्काळजीपणाहि जाणवण्यासारखा आहे. कांही वाक्यांत शद्बांची पुनरावृत्ति, कांही शद्बांचा अप्रस्तुत वापर, कांही ठिकाणी भोंगळ वाक्यरचना, इत्यादि किरकोळ दोषहि प्रत्यक्ष वाचनांत कधीं कधीं बरेच जाणवतात. परंतु कथेचें सिंहावलोकन करतांना तिचे गुणच अधिक जाणवणें अपरिहार्य आहे. एवढ्या सुलक्षणी कथेचा पुढील विकास तसाच जोमदार व्हावा ही सर्वच रसिकांची इच्छा असणार.

—कुसुमावती देशपांडे.

सोबत (ले. ना. सी. फडके; प्र. अंजलि प्रकाशन लि. मुंबई; पृष्ठें १६२; कि. २ रु.)

श्री. ना. सी. फडक्यांच्या निवडक उत्कृष्ट कथांचा हा सतरावा संग्रह आहे. मराठी कथावाङ्मयाला आज जें भरघोस व दृष्ट लागण्याजोगे रूप आलें आहे, त्या या काळांत श्री. फडके यांच्यासारख्या लेखकाच्या या कथा वाचून निराशा होते. ताज्या दमाचे नवे लेखक आज याहून अधिक खोल आशयाच्या सुन्दर, सजीव कथा लिहित आहेत. क्वचित् या नवकथाकारांचें फडके अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत आहेत असें वाटतें. 'प्रकाश हवा, पण आग नको' या कथेंतील रस तिच्या मथळ्यामुळे कमी होतो. त्यांतील सूचकता एरव्ही मनोज्ञ वाटून ह्या एका कथेसाठी संग्रहाविषयीं चार अगत्याचे शद्ब लिहिणें शक्य झालें असतें.

— केशव केळकर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पत्र-व्यवहार

(१)

श्री. संपादक 'युगवाणी' यांस

स. न. वि. वि.

युगवाणीच्या जून महिन्याच्या अंकामध्ये छापलेला श्री. राजशेखर यांचा मराठी वाङ्मयाची इंग्रजींतील अनुचित ओळख हा लेख वाचला. United Asia या मासिकाने स्वातंत्र्याचा निरनिराळ्या भारतीय भाषांवर कसा काय परिणाम झाला आहे या बाबत प्रमुख टीकाकारांकडून लेख मागवून ते छापले. श्री. मं. वि. राजाध्यक्ष, श्री. श्री. के. क्षीरसागर, श्री. रा. भी. जोशी आणि श्री. वा. ल. कुलकर्णी यांनी करून दिलेल्या मराठीच्या परिचयामुळे असंतुष्ट होऊन श्री. राजशेखर यांनी हा लेख लिहिला आहे.

एखाद्या भाषेतील वाङ्मयाचा परिचय परभाषेंत करून देण्याचें काम मोठें जबाबदारीचें आणि बरेंच अवघड असतें. परिचय लेखकाचा स्वतःचा असा दृष्टिकोन आणि आवडी निवडी असूं शकतात आणि त्याचा प्रभाव त्याच्या परिचयलेखनावर पडण्याची शक्यता असते. तसें झाल्यास वाङ्मयप्रवाहाचा तटस्थदृष्टीनें वस्तुनिष्ठ परिचय करून दिला जात नाही व सत्यापलाप होणें शक्य असतें. अशा प्रमादाची तात्काळ दखल घेतली जाणें फार आवश्यक असतें, नाही तर चुकीचे समज रूढ होण्याची भीति असते. तशा नुकत्याच घडलेल्या एका प्रकाराकडे लक्ष वेधून आणि त्यांतील दोषस्थळें नेमकीं दाखवून मराठी संबंधीं श्री. राजशेखर यांनी एक मोठी जबाबदारी पार पाडली आहे आणि त्याबद्दल ते केव्हांहि अभिनंदनास पात्रच आहेत.

परंतु खालील गोष्टी नमूद करणेंहि मला अत्यंत आवश्यक वाटतें–

१ पहिला मुद्दा असा कीं अशा प्रकारच्या लेखांचें स्वरूप हल्ल्या प्रतिहल्ल्याचें राहूं नये असें मला वाटतें. अशा लेखांत वस्तुस्थितीचा नीट उकल होण्यास वाव नसतो आणि लेखातून वाङ्मयप्रवाहांचें एक संपूर्ण चित्र वाचकाच्या डोळ्यासमोर उभें राहत नाही.

तसेंच परभाषेंत परिचय करून देणारांनी आवश्यक तेवढी तटस्थता बाळगली नाही; त्यांच्या लेखांत हवी तेवढी परिपूर्णता आलेली नाही व त्यांच्या खाजगी आवडीनिवडींचा प्रभाव लेखांवर पडून वाङ्मयाचें विकृत आणि अपुरें स्वरूपच परभाषिकांसमोर मांडण्यांत आलें असें म्हटल्यास हरकत नाही. परंतु याहून वेगळ्या प्रकारचे आरोप टीकाकारांवर करणें गैरलागू ठरतें. श्री. राजशेखर यांच्या या जोरदार शैलीच्या लेखांत हें वैगुण्य राहिलें नसतें तर फार बरें झालें असतें. कारण त्यामुळे समज न वाढतां केवळ गैरसमज मात्र वाढतात. तेव्हां वरील टीकाकारांच्या हेतुबाबत संशय न घेतां त्यांच्या विधानांचें अधिक विस्तारानें विश्लेषण झालें असतें तर आहे त्याहून अधिक मोल या लेखाला चढलें असतें, असें मला वाटतें.

(२) अमका नवकवि नाही आणि तमका आहे असें म्हणतांना अशीं विधानें कोणत्या आधारावर केली जातात तें स्पष्ट होत नाही. नवकाव्याचें व्यवच्छेदक लक्षण कोणतें ? त्या बाबतींत मी माझे विचार संक्षिप्तपणे मांडूं इच्छितों :–

(क) सरंजामी समाज रचनेत प्रत्येकाचें समाजांतील स्थान वंशपरंपरागत परिस्थितीमुळे ठरलेलेच असे. इंग्रजी विवेकवादानें व्यक्तिस्वातंत्र्याचा जय घोष करून ही चौकट मोडून टाकण्याचा यशस्वी प्रयत्न केला. माणसामाणसांतील समानता व व्यक्तीचें स्वातंत्र्य या नव-विचाराच्या गर्भाची भराभर वाढ होऊन समाजाच्या जुन्या कवचास तडे पडूं लागले. याच व्यक्तिस्वातंत्र्य भावनेचा केशवसुतांच्या काव्यांत उत्कटत्वानें आविष्कार झाला. केशवसुतांनी स्वतःच्या भावनांचा (एका साध्या माणसाच्या भावनांचा) आविष्कार करताना पर्यायाने तत्कालीन समाज ध्येयाचा आविष्कार केला.

व्यक्तीच्या भावनांचा तो उत्कट आविष्कार असल्यामुळे त्याचें स्वरूप उद्‌गारात्मक बनणें अपरिहार्य झाले. व त्यामुळेंच तें काव्य भावगीतात्मक झालें.

केशवसुतांच्या व्यक्तिभावनेची सामाजिक प्रगतीच्या ध्येयाशीं एकरूपता येथें लक्ष्यांत ठेवली पाहिजे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(ख) पुढील काळांत नव्या ज्ञानामुळं संपूर्ण समाजाची प्रगति न होता नोकरपेशा मध्यम वर्ग मात्र सुधारला. समाजाचे सरंजामी बंध तोडायला जनतेच्या साम्राज्यविरोधी लढ्याशी एकरूप होणें त्याच्या प्रकृतींतच नव्हतें. म्हणून एकंदर समाज साम्राज्य विरोधी लढ्याकडे न वळतां मध्यमवर्गीय आपल्या वैयक्तिक भावनांच्या आविष्कारांतच गुंग झाला. अर्थातच त्याची सुखदुःखें निराळीं बनलीं. भारतीय जीवनाशीं संबंध तुटून जाऊन अधांत्री लोंबणारा असा हा एक वर्ग निराळा झाला. परंतु हा वर्गहि आर्थिक क्षेत्रांत, सुधारणेच्या आणि ज्ञानाच्या क्षेत्रांत विकासत होता तोंवर कुंडीतल्या फुलझाडा प्रमाणें या वर्गांतील व्यक्तींच्या जीवनांतहि टवटवी राहिली. केशवसुतांच्या ध्येयदर्शी कवितेपासून मा. ज्यू. च्या स्त्रीपूजक काव्यापर्यंत मराठी कवितेंत एक प्रकारचा जिवंतपणा खेळत होता.

(ग) हाहि भर ओसरला. आर्थिक संकटांत हा प्रेम करणारा मध्यम वर्ग पिचून गेला. केशवसुतांच्या काळी अत्यंत कष्ट करून शिकणाऱ्या व्यक्तींसमोर पुढें बरीशी नोकरी मिळण्याचें गुलाबी स्वप्न तरी असे. असें काहींहि या शिक्षितां समोर नव्हतें. समाजापासून संबंध तुटलेले, भविष्य अंधकार मय असलेलें अशा परिस्थितींत मध्यमवर्गीय अत्यंत एकाकी बनला.

केशवसुतांच्या काळी व्यक्तीची स्वतःचा विकास करून घेण्याची इच्छा जुन्या समाज व्यवस्थेशीं ज़ोराने टकरावत असे व म्हणून तिला समाज प्रगतीच्या संघर्षाचें स्वरूप आपोआप प्राप्त होत असे. पुढे समाज (मध्यम वर्गापुरता) सुधारला. स्वतःचा विकास करून घेण्यास मोकळीक होतीच. आतां व्यक्तीनें समाजाला सुधारण्यासाठी समाजाच्या लढ्यांत सामील होणें आवश्यक होते. तरच व्यक्तीची आकांक्षा आणि समाजाची आकांक्षा एक होणें शक्य झालें असतें. परंतु समाजाच्या नदीने वळण घेतलें व मध्यमवर्ग पूर्ण एकटा झाला. व्यक्ति आणि समाज यांत दोन ध्रुवा इतकें अंतर निर्माण झाले. व्यक्तीचे समाजाशी असणारे मूलभूत दुवेच हरवले. व्यक्ति ही संपूर्णपणे एकाकी बनली.

(घ) याच परिस्थितींत नवकाव्याचा जन्म झाला, हे हरवलेले मूलभूत दुवे परत शोधून काढण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न म्हणजे नवकाव्य. व्यक्तीनें स्वतःच्या भावनांचें सामाजिक प्रगतिच्या दृष्टिकोणामधून केलेलें कठोर विश्लेषण म्हणजे नवकाव्य.

केशवसुताच्या काळी व्यक्तिध्येय आणि समाजध्येय एक होतें. पुढें व्यक्तीचें स्वप्न आणि समाजाचें स्वप्न यांत उत्तरोत्तर अंतर पडत गेलें. व सरते शेवटी त्यांत पूर्ण फारकत झाली. त्याच एकाकी व्यक्तीने प्रेमाच्या शोधार्थ समाजाकडे फिरून परत जाण्यासाठी चालविलेल्या निर्भय परंतु संकटमय यात्रेचें दर्शन नवकाव्यांत घडते.

(ङ) ज्याअर्थी नवकाव्यांत व्यक्तीनें अत्यंत व्याकुळ होऊन तिचे समाजाशी असलेले संबंध शोधून काढण्यासाठी चालविलेल्या विश्लेषणाचें दर्शन आपणांस घडतें त्या अर्थी काव्याचें स्वरूप गीतात्मक न राहतां तें मुक्तछंदात्मक होणें अपरिहार्यच होतें. केशवसुत कालीन उद्गारात्मकतेची अपरिहार्यता जाऊन तितक्याच अपरिहार्यपणें मुक्तछंदाची निर्मिती झाली. केशवसुतांच्या काळांतील कवितेंत दृढ सामाजिक आशय आहे तसाच तो आजच्या कवितेंतहि आहे. परंतु पूर्वी व्यक्तीच्या आकांक्षेतूनच समाजाच्या आकांक्षेची अभिव्यक्ति होत असे. आणि आज समाजाच्या प्रगति तत्वाशीं स्वतःचा संबंध स्थापित करण्यासाठीं व्यक्तीनें धडपड चालविली आहे; आंतर्बाह्याचें अंतरंग शोधन चालविलें आहे. समाजाशीं हा नवा संबंध, ही विश्लेषणात्मकता हीच आजच्या नवकाव्याची बैठक होय. हेंच नवकाव्याचें व्यवच्छेदक लक्षण होय. निवळ नवी प्रतिमा किंवा नवा छंद म्हणजे नवकाव्य नव्हे.

(च) या दृष्टीने पाहतां श्री. आ. रा. देशपांडे उर्फ कवि अनिल यांनाच नवकाव्याच्या प्रणेत्याचा मान द्यावा लागेल. १९४३च्या सुमारास त्यांचें 'प्रेम आणि जीवन' हे दीर्घ चिंतनप्रधान काव्य प्रसिद्ध झालें. त्यांत व्यक्तिप्रेमाच्या विफलते संबंधीं मानवी प्रगतीच्या दृष्टिकोणामधून विचार झाला आहे. व्यक्तिभावने बाबत एक नवी सामाजिक जागरुकता त्यांत व्यक्त झाली आहे. श्री. अनिल यांचें पुढील काव्य लेखनहि याच प्रकारचें आहे. तेव्हा नवकाव्याचा विचार करताना कवि अनिलांना विसरून केंव्हाहि चालणार नाही. तो केवळ वाङ्मयीन सत्याचा विपर्यास ठरेल. मला वाटतें नवकाव्याच्या विश्लेषणात्मक या स्वरूपाबद्दल चर्चा होणें जरूर आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीतील नामवंत टीकाकारांनी व श्री. राजशेखरांनीहि नवकाव्याचें व्यवच्छेदक लक्षण कोणतें या बाबत विचार मांडला असता तर विशेष उत्तम झालें असतें.

कळावें लोभ असावा हे विनंति

आपला

शरच्चंद्र मुक्तिबोध

२०. ६. ५४

मराठी वाङ्मयाची इंग्रजींतील अनुचित ओळख

(२)

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध व्यासंगी विवेचक प्रा० श्रीकृष्ण केशव क्षीरसागर आपल्या ९–६–५४ च्या पत्रांत म्हणतात–

...... राजशेखर म्हणजे कोण हें मला माहीत नाही. तथापि त्यांनी United Asia मधील परिसंवादवजा लेखांची हजेरी मला बहुतांशी योग्य अशीच वाटली. ... आम्ही पत्करलेलें काम सर्कशींत स्टुलावर हत्ती उभा करण्यांतलें होते. दोन पानांत वरेच प्रवाह व त्यांचे पुरावे द्यायचे होते. पानांची मर्यादा मला माहीत होती त्यामुळें परिस्थितीचा तपशील दोषांचें समर्थन होऊं शकत नाही. राजशेखर यांनी रेगे यांच्या काव्यासंबंधी जें लिहिलें आहे तें अत्यंत समर्पक आहे व मला तें शंभर टक्के मान्य आहे. रेगे यांच्या काव्यावर लिहितांना व बोलतांना मी हेंच नसलें तरी प्रतिकूल बोललों आहे. मर्ढेकरांच्या काव्याबाबत मात्र माझा मतभेद आहे त्यांत सामाजिक आशय 'दृढ' आहे असें क्षणभर मानलें तरी तो नवा किंवा वैशिष्ट्यपूर्ण आहे असें नाही. आणि त्यांत काव्य तर त्याहूनहि नाही असा अभिप्राय मी अनेकदा व्यक्त केलेला आहे. 'मुंबई पट्टणस्य' साहित्यसंवर्धकांच्या मौनासंबंधी तुम्हीं केलेलें मर्मभेदक निदानही अगदीं सत्य आहे...

मराठी पुस्तकांची यादी अपुरी व सदोष आहे. गोरे यांनी हें काम आपद्धर्म म्हणून केलें असावें... हल्लीं इतरांनी घोळून ठेवलेल्या नांवांचें तर्पण प्रथम केलेंच पाहिजे अशी कोंडीच निर्माण झाली आहे... मी अरविंद गोखले यांना जें श्रेय दिलें आहे त्याबद्दल आपला गैरसमज आहे. ज्यांचे अकारण नगारे वाजविले जातात अशा 'तथाकथित' Pioneers मध्यें त्यांतल्यात्यांत गोखलेच अधिक प्रामाणिक आहेत असा ध्वनि आहे. श्री. भावे यांना मी या विशिष्ट गटांतून नेहमींच बाहेर काढतो. व त्यांचे साहित्यगुण आणि विचारसामर्थ्य या सर्वांहून श्रेष्ठ आणि वेगळे समजतो... श्री. मुक्तिबोध यांच्यासंबंधीच्या तुमच्या मताचा मी विचार करीत आहे.

(३)

पुण्याचे एक सुविख्यात प्रकाशक, ग्रंथविक्रेते आणि मराठी वाङ्मयाचे चोखंदळ रसिक वाचक 'राजशेखर' यांना लिहिलेल्या पत्रांत म्हणतात–

आपला लेख कल्पनातीत आवडला. त्यांतील शास्त्रशुद्ध विचारसरणी, चिकित्सक विवेचन पद्धति या सर्वच दृष्टीनें सदर लेख उत्कृष्ट आहे. अशाप्रकारचे निर्भीड पण वस्तुस्थितिनिदर्शक लिखाण आजकाल मराठींत क्वचित्‌च आढळते. सदर लेखांत प्रतीत झालेलें अभ्यासपूर्ण निरीक्षण मार्मिक तर आहेच पण ज्या रेखीव व ठांशीव भाषेंत आपण मांडले आहे तें अत्यंत अभिनंदनीय आहे ...

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ,
यांजकडून.

कै. बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांची १०८ वी पुण्यतिथि

दि. २५ मे १९५४ रोजीं महाराष्ट्राचे आद्य सुधारक कै. बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांची १०८ वी पुण्यतिथि संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांचे अध्यक्षतेखाली साजरी झाली. या प्रसंगीं ख्यातनाम साहित्यिक व संशोधक प्रा. डॉ. वि. भि. कोलते यांचें कै. जांभेकर यांच्या विविध कामगिरीवर मोठें विचारपरिप्लुत भाषण झालें. तद्वत्च म. म. प्रि. वा. वि. मिराशी यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या संशोधन कार्याची ओळख करून दिली.

● ●

सांस्कृतिक कार्यक्रम समिति : कौमुदी उत्सव

सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे कौमुदी उत्सवाचा दुसरा कार्यक्रम शनिवार दि. १९ जून १९५४ रोजीं साजरा झाला. या कार्यक्रमांत श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या 'क्षिप्रा' या कादंबरीवर श्री. श्री. वि. गंधे व श्री. पां. व. गाडगीळ आणि श्री. गो. रा. दोडके यांच्या 'माहेरवाशीण' या लघुनिबंध संग्रहावर प्रा. के. ज. पुरोहित व श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांनी मार्मिक चर्चा केली. त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध कवि श्री. वा. रा. कान्त यांनी कार्यक्रमाच्या प्रारंभीं 'माझ्या कांही कवितांची जन्मकथा' या विषयावर सुंदर भाष्य केलें व आपली एक कविताहि म्हणून दाखविली. संपूर्ण कार्यक्रम मोठा हृद्य झाला.

● ●

कै. भाऊजी दप्तरी स्मृती
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

———

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन.

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रतिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें,

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ★ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. कुंडलराय मोहेकर यांनी अशोक मुद्रणालय, धर्मपेठ, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. ह. ना. नेने, अध्यक्ष, वि. सा. संघ, यांनी संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ